## कनिष्ठ डॉक्टरांचे राष्ट्रपती मुर्मूंना पत्र

■ वृत्तसंस्था, कोलकाता दि. १३:
कोलकाता येथील आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये ८ ऑगस्ट रोजी झालेल्या प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्येच्या विरोधात कनिष्ठ डॉक्टरांचे आंदोलन ३५ व्या दिवशीही सुरू आहे. आंदोलन संपवण्यासाठी डॉक्टर आणि बंगाल सरकारमध्ये एकमत नाही.डॉक्टरांनी शुक्रवारी आरोग्य भवनाबाहेर अभया क्लिनिक नावाचे शिबिर सुरू करून रुग्णांवर उपचार सुरू केले.

आता या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची मागणी डॉक्टरांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधानांकडे केली आहे. त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवत हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक १५६ * * नागपूर *
शनिवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२४
पुरवणीसह पाने ८
किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

### अग्रलेख खरीखरी...

## मंदिराचा शाप, उद्दंडांचे पाप

बांगलादेशात खरोखरच एक चमत्कार घडला. गेल्या काही दिवसात येथील प्रधानमंत्री शेख हसीना यांना केवळ सत्ताच गमवावी लागली नाही. तर देश सोडावा लागला. या घटनेनंतर बांगलादेशातील हिंदूंना टार्गेट करून एक तर मारण्यात आले किंवा जखमी करण्यात आले. येथील धर्मांध शक्ती एवढ्या प्रबळ झाल्या होत्या की, त्यांच्यासमोर अगदी सर्वांनीच आपले हात टेकले होते. सहाशे वर्षांपूर्वी ढाक्यातील ढाकेश्वरी मंदिराचा दरवाजा कुलूप लावून बंद केला करण्यात आला होता. याचे कारण त्या काळातील कट्टरपंथी मुस्लिमांनी त्या मंदिरात हवन पूजा करणाऱ्या अनेक साधुसंतांना मारून टाकले होते. त्यानंतर एका संताने असा शाप दिला होता की, यापुढे जोपर्यंत एक मुस्लिम व्यक्ती या देवीची पूजा करून पापक्षालन करत नाही. तोपर्यंत माझा शाप कायम राहील. तो शाप असा होता की, यापुढे या मंदिरात जो कोणी तोडफोड करील किंवा या ठिकाणी घृणीत कार्य करील अथवा देवीची विटंबना करील तो जिवंत राहणार नाही. चमत्कार असा घडला की ज्या दहा कट्टरपंथीयांनी मंदिरात दंगलीच्या काळात कुलूप उघडून तोडफोड आणि नासधूस केली. त्यांचे म्होरके जे दहा लोक होते. ते दहाच्या दहा लोक चक्क दोन-तीन दिवसातच मारले गेले. कुणावर हल्ला झाला, कोणाचा आजारपणातच मृत्यू झाला. कोणाला अपघाती मरण आले, तर कुणी अकस्मात मरण पावले. हे सर्व बघितल्यावर बांगला देशचे सध्याचे प्रधानमंत्री मोहम्मद युनुस यांनी या मंदिराला भेट दिली. स्वतः मुसलमान असूनही मंदिरातील देवीची साग्रसंगीत पूजा केली. हात जोडून माफी मागितली आणि केवळ हेच मंदिर नाही तर ज्या ज्या मंदिरात तोडफोड झाली. त्यांच्या उभारणीचे आश्वासन दिले. बांगलादेशातील सध्याच्या परिस्थितीत जातीय दंगली होत आहेत. त्या थांबण्याचे नाव घेत नाहीत. अनेकांना यामुळे घरादाराची राख रांगोळी होताना उघड्या डोळ्यांनी पहावी लागत आहे. एकूणच बांगला देशातील सौहार्दाचे वातावरण बिघडवण्यात या दंगलींचा फार मोठा वाटा आहे. मोहम्मद युनूस यांना शेख हसीना सत्तेत असताना बराच त्रास सहन करावा लागला होता. त्यांच्यावर इतके खटले दाखल करण्यात आले होते की, नोबेल पुरस्कार विजेत्या व्यक्तीला चक्क देश सोडावा लागला होता. त्यांच्या हाती सत्ता आल्यावर त्यांनी वारंवार आवाहन करूनही जातीय दंगली थांबत नव्हत्या. पण आता बांगला देशातील एक कोटी हिंदूही संघटित झालेले आहेत. त्यांनी एकजुटीने हल्लेखोरांचा प्रतिकार करून मंदिरांचा बचाव करण्याचे काम सुरू केले आहे. या ढाकेश्वरी मंदिराच्या सहाशे वर्षानंतरच्या कुलूप तोडल्याच्या या घटनेमुळे जो चमत्कार घडला. त्याचाही थोडाबहुत परिणाम दिसून येत आहे. तोडफोड करणारे मेले. त्याचा मोठा गाजावाजा झाला. त्यामुळेच मोहम्मद युनूस यांनी सहाशे वर्षांपूर्वी दिलेल्या शापाचे परिमार्जन करण्यासाठी मंदिरात जाऊन पूजा केली. बांगला देशात आत्तापर्यंत हिंदू मुस्लिम यांच्यामध्ये बरेच सख्ख्य होते. भारताने पाकिस्तानच्या तावडीतून आपल्याला मुक्त केले. याची आताच्या काही मुस्लिम धर्म मार्तंडांना सोडून इतर सर्वांना चांगलीच जाणीव होती. पण या कट्टर पंथीयांनी बांगला देशचे मुक्तिदाता शेख मुजिबूर रेहमान यांचाही पुतळा तोडण्यास कमी केले नव्हते. याचा सरळ अर्थ म्हणजे ज्यांची ज्यांची भारताबद्दल किंवा तेथील हिंदू अल्पसंख्याकांबद्दल सहानुभूती आहे. अशी सर्व प्रतीके नष्ट करणे, हा त्यांचा एक मात्र अजेंडा होता. आता अशा भीषण परिस्थितीत मोहम्मद युनूस यांनी मनाचा मोठेपणा दाखवून आणि कट्टर पंथीयांची नाराजी ओढवूनही जे पाऊल उचलले आहे. त्यामुळे बांगला देशात हळूहळू शांतीचा मार्ग खुला झाला आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. मंदिराच्या तोडफोडीमुळे ज्या पद्धतीने दहा धर्मवेड्यांचा जीव गेला. त्यामुळे बांगला देशातील हिंसाचार थांबणार असेल, तर तेही अत्यंत महत्त्वाचे आहे. एकूणच बांगला देशच्या आताच्या परिस्थितीत ही अत्यंत आशादायक वार्ता आहे. बांगलादेशात कोणाचेही सरकार असले, तरी भारताशी सख्ख्य ठेवल्याशिवाय बांगलादेशला गत्यंतर नाही. अशीच एकूण परिस्थिती आहे. हे वातावरण असेच सुधारत राहो, एवढीच देवी ढाकेश्वरी चरणी आमची प्रार्थना आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# महाविकास आघाडीत खडाजंगी

### पवार, उबाठाच्या मागणीने काँग्रेस नाराज



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३:
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात विरोधी महाविकास आघाडीत जागावाटपावरून पेच निर्माण झाला आहे. मुंबईतील ३६ विधानसभा जागांपैकी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला २१ जागांवर निवडणूक लढवायची आहे. त्यासाठी उद्धव ठाकरे गटानेही तयारी सुरू केली आहे. याशिवाय शरद पवार सातपेक्षा जास्त जागांची मागणी करत आहेत. या संदर्भात काँग्रेसला केवळ ८ जागा मिळतील. त्यामुळेच जागावाटपावरून घमासान आहे.

शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाने मुंबईतील ३६ पैकी २१ विधानसभा जागांवर निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे. शरद पवारांना ७ जागा हव्या आहेत. अशा स्थितीत काँग्रेससाठी केवळ ८ जागा शिल्लक राहिल्याने पक्षात नाराजी आहे.

शरद पवार यांनी मुंबईतील अंधेरी पश्चिम, वसोर्वा, कुर्ला, अणुशक्ती नगर, दहिसर, घाटकोपर पूर्व आणि घाटकोपर पश्चिम या जागांची मागणी केली आहे. महाराष्ट्रात नोव्हेंबरमध्ये विधानसभेच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. आघाडीमध्ये जागावाटप आणि मुख्यमंत्री चेहरा याबाबत अंतर्गत मतभेद असू शकतात, मात्र आगामी विधानसभा निवडणुकीत आघाडीचे नेते सरकार स्थापनेचा दावा करआहेत.

बाळासाहेब थोरात यांनी सांगितले होते की, आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मविआ २८८ पैकी १८० पेक्षा जास्त जागा जिंकेल. आघाडी मध्ये १२५ जागांवर एकमत झाले आहे आणि उर्वरित जागांसाठी बोलणी सुरू आहेत.

महाराष्ट्रात २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी मध्ये समाविष्ट असलेल्या पक्षांनी चांगली कामगिरी केली होती. राज्यातील एकूण ४८ लोकसभा जागांपैकी मविआ ने ३० जागा जिंकल्या होत्या.

त्याचवेळी या निवडणुकीत सत्ताधारी महायुती आघाडीला नुकसान सहन करावे लागले. महाआघाडीत सामील असलेल्या पक्षांनी एकूण १७ जागा जिंकल्या होत्या. परिणामी, अधिक जागा लढण्याकडे काँग्रेसचा कल आहे. परंतु, उबाठा आणि शरद पवारांच्या अट्टहासामुळे आघाडीत पेंच निर्माण होण्याचे संकेत आहेत.

## सोनिया गांधी, बजरंग पुनिया विनेश फोगाट स्टार प्रचारक

### हरियाणा निवडणुकीसाठी काँग्रेस सज्ज

■ वृत्तसंस्था, हिसार, दि. १३:
हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने आज स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली. या यादीत ४० नेत्यांच्या नावांचा समावेश आहे. संपूर्ण गांधी परिवार हरियाणात मते मागणार आहे.

नुकतेच काँग्रेसमध्ये दाखल झालेले कुस्तीपटू बजरंग पुनिया आणि विनेश फोगट यांचाही स्टार प्रचारकांमध्ये समावेश करण्यात आला आहे. या दोन्ही माध्यमातून काँग्रेस संपूर्ण हरियाणात प्रचार करणार आहे. याशिवाय माजी मुख्यमंत्री भूपेंद्र सिंह हुड्डा, खासदार कुमारी शैलजा, राज्यसभा खासदार रणदीप सुरजेवाला, खासदार दीपेंद्र हुड्डा यांच्या नावांचाही समावेश आहे. एक मुख्यमंत्री आणि तीन माजी मुख्यमंत्रीही मत मागण्यासाठी हरियाणात येणार आहेत.

काँग्रेसने केलेल्या तयारीनुसार लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियांका गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे रोहतक, हिसार, कर्नाल, अंबाला आणि गुरुग्राम लोकसभा मतदारसंघात रॅली घेणार आहेत. प्रत्येक नेत्याच्या तीन ते चार सभा होतील. ज्या ठिकाणी काँग्रेसची स्थिती कमकुवत आहे आणि स्टार प्रचारकांची मागणी जास्त आहे अशा ठिकाणी मोठ्या नेत्यांच्या सभा अधिक होतील.

## केजरीवाल तुरुंगातून बाहेर



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३:
दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल शुक्रवारी संध्याकाळी तिहार तुरुंगातून बाहेर आले. १७७ दिवसांनंतर त्यांची सुटका झाली.

आज सकाळी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली दारू धोरणाशी संबंधित सीबीआय प्रकरणात केजरीवाल यांना जामीन मंजूर केला. ईडी प्रकरणात जामीन देताना ज्या अटी घालण्यात आल्या होत्या, त्याच अटी न्यायालयाने जामिनासाठी घातल्या आहेत.

मी सच्चा होतो, म्हणून देवाने मला साथ दिली. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर माझी ताकद १०० पटीने वाढली आहे.

ईडी आणि सीबीआयने केजरीवाल यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्यांना १२ जुलै रोजी ईडी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयातून जामीन मिळाला होता. आपने या निर्णयाचे वर्णन सत्याचा विजय असे केले आहे.

ईडीने त्यांना २१ मार्च रोजी दारू धोरण प्रकरणी अटक केली होती. त्यानंतर २६ जून रोजी सीबीआयने त्यांना तुरुंगातून ताब्यात घेतले.

## सौर कृषिपंपांतून शेतकऱ्यांना विकता येणार वीज

■ वृत्तसंस्था, छ.संभाजीनगर, दि. १३:
कृषिपंपाच्या वीज कनेक्शनसाठी शेतकऱ्यांनी अनेक वर्षे वाट पाहण्यापासून मागणीनुसार तत्काळ कृषिपंप अशी राज्याची वाटचाल मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेमुळे झाली आहे. आगामी काळात सौर कृषिपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली अतिरिक्त वीज विकून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्यासाठी योजना लागू करण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यात १२ हजार मेगावॅट वीजनिर्मितीचे करार झाले आहेत. आगामी दोन वर्षात त्यातून पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती सुरू होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी शंभर टक्के सौर ऊर्जा मिळेल, असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## पोर्ट ब्लेअर यापुढे श्री विजयपुरम

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १३:
केंद्रशासित प्रदेश अंदमान आणि निकोबार बेटांची राजधानी असलेल्या पोर्ट ब्लेअरचे सरकारने शुक्रवारी श्री विजयपुरम असे नामकरण केले. गृहमंत्री अमित शहा यांनी सोशल मीडियावर ही माहिती दिली.

शहा म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गुलामगिरीच्या सर्व प्रतीकांपासून देशाला मुक्त करण्याच्या संकल्पाने प्रेरित होऊन आज गृह मंत्रालयाने पोर्ट ब्लेअरचे नाव 'श्री विजयपुरम' ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

यापूर्वी, नेताजींच्या 126 व्या जयंतीदिनी पंतप्रधान मोदींनी अंदमान आणि निकोबार बेटांच्या 21 बेटांना परमवीर चक्र विजेत्यांच्या नावावर नाव देण्याचा निर्णय घेतला होता.

28 डिसेंबर 2018 रोजी अंदमान आणि निकोबारच्या हॅवलॉक बेट, नील बेट आणि रॉस बेटाची नावे बदलण्यात आली. हॅवलॉक बेटाचे नाव स्वराज द्विप, नील बेटाचे नाव शहीद द्विप आणि रॉस बेटाचे नाव नेताजी सुभाषचंद्र द्विप ठेवण्यात आले.

### हे तर कायद्यांवर बुलडोझर..

■ नवी दिल्ली : बुलडोझरची कारवाई म्हणजे देशाच्या कायद्यांवर बुलडोझर चालवण्यासारखे आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. एखाद्याचा गुन्ह्यात सहभाग असल्याचा आरोप त्याच्या मालमत्तेचा पाडाव करण्याचा आधार असू शकत नाही.

न्यायमूर्ती हृषिकेश रॉय, न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती एसव्हीएन भाटी यांच्या खंडपीठाने घर पाडण्याशी संबंधित याचिकेच्या सुनावणीदरम्यान ही टिप्पणी केली.

### चंदिगडमध्ये ग्रेनेड अटॅक

चंदीगड : पाकिस्तानच्या इंटर सर्व्हिस इंटेलिजन्सच्या सांगण्यावरून चंदीगडमधील सेक्टर १० येथील घरावर ग्रेनेड हल्ला करण्यात आला होता. त्याचा मास्टरमाइंड पाकिस्तानात बसलेला दहशतवादी हरविंदर रिंदा आहे. अमेरिकेत बसलेल्या हॅप्पी पासियाच्या माध्यमातून त्याने हे काम पूर्ण केले. पोलिसांनी रोहन मसिह नामक एका आरोपीला अटक केली आहे. त्याच्याकडून ९ एमएम पिस्तूल आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे.

### खासदार अमृतपालच्या नातेवाईकांवर छापा

अमृतसर : राष्ट्रीय तपास संस्थेने पंजाबमध्ये आज छापा टाकला. अमृतसरमध्ये टीमने खलिस्तान समर्थक आणि खदूर साहिबचे खासदार अमृतपाल सिंग यांच्या नातेवाईकांच्या घरांवर छापे टाकले.

रैया येथील फेरुमन रोडवरील अमृतपाल सिंगचे काका प्रगत सिंग यांच्या घरी पोहोचले. या पथकाने प्रगत सिंग यांच्या पत्नीला ताब्यात घेतले आहे. अधिकारी त्यांना बियास पोलिस ठाण्यात घेऊन गेले, तेथे त्यांची सुमारे ३ तास चौकशी करण्यात आली.

गेल्या वर्षी प्रगत सिंगवर गुन्हा दाखल करण्यात आला होता आणि त्या प्रकरणाच्या संदर्भातच हा छापा टाकण्यात आला होता.

दुसरा छापा अमृतसरमधील सठियालाजवळील बुटाला येथे अमृतपाल यांच्या भावाच्या घरी टाकण्यात आला. तिन्ही छापे अमृतपालशी संबंधित आहेत. २३ मार्च २०२३ रोजी कॅनडातील खलिस्तान समर्थकांनी भारतीय उच्चायुक्तालयावर केलेल्या हल्ल्याच्या संदर्भात एनआयएने हा छापा टाकला.

### टायटलर यांच्यावर हत्येचे आरोप निश्चित

नवी दिल्ली : १९८४ शीख दंगल प्रकरणी दिल्ली न्यायालयाने काँग्रेस नेते जगदीश टायटलर यांच्यावर आरोप निश्चित केले आहेत. कोर्टाने टायटलरवर खून, बेकायदेशीर सभा, दंगल, दंगली भडकावणे, वेगवेगळ्या गटांना एकमेकांविरुद्ध भडकावणे, घुसखोरी आणि चोरीचे आरोप निश्चित केले आहेत.

टायटलर यांनी सीबीआयच्या आरोपांवर म्हटले होते की ते दोषी नाहीत.

## राज्यपालपदाची ऑफर होती...



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३:
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला राज्यपाल करण्याचे आश्वासन दिले होते, असा मोठा दावा आमदार एकनाथ खडसे यांनी केला आहे. खडसे व फडणवीस यांच्यातील राजकीय मतभेद सर्वश्रुत आहे. त्यातच खडसेंनी हा दावा करून फडणवीस यांना एकप्रकारे आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे.

एकनाथ खडसे एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी मला एके दिवशी बोलावले होते. तेव्हा आम्ही दोघेच होतो. तेव्हा देवेंद्र फडणवीस म्हणाले, नाथाभाऊ तुमची मी राज्यपालपदासाठी शिफारस करतो. त्यावर मी त्यांना म्हणालो, माझा यावर विश्वास बसत नाही. यावर फडणवीस म्हणाले, मी माझ्या एकुलत्या एक मुलीची शपथ घेऊन सांगतो हा देवेंद्र फडणवीसचा शब्द आहे. पुढे काय झाले मला माहिती नाही. अजूनही भाजपने माझा प्रवेश झाल्याचे घोषित केले नाही. आता भाजपमध्ये जाण्याच्या मार्गावर मी फुली मारल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मुंबईतील डबेवाल्यांना फक्त २५ लाखात घर



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३:
पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत म्हाडाकडून मुंबईतील डबेवाल्यांसाठी घर बांधले जाणार असल्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या योजनेचा चर्मकार समाजालाही फायदा मिळणार आहे. या योजनेतून मुंबईतील डबेवाले आणि चर्मकार समाजाला ५०० चौरस फुटाचे घर अवघ्या २५ लाख रुपयांमध्ये मिळणार असल्याची घोषणा सरकारच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात डबेवाले संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत सह्याद्री अतिथी गृहावर उपमुख्यमंत्री फडणवीस यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये मुंबईतच डबेवाल्यांना घर देण्यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईच्या डबेवाल्यांना मुंबईत घर मिळावे, यासाठी पाठपुरावा केला जात होता. डबेवाल्यांच्या या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. त्यामुळे आता या मुंबईतील डबेवाल्यांना मुंबईमध्ये पाचशे चौरस फुटापर्यंतचे घर मिळणार आहे. डबेवाल्यांसाठी ही अत्यंत आनंदाची बातमी मानली जात आहे.

मुंबईच्या डबेवाल्यांसोबतच चर्मकार समाजासाठी एकूण १२ हजार घरांची निर्मिती केली जात असल्याचे सरकारच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांची घरवापसी



■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. १३:
पाच वर्षांपूर्वी काँग्रेस सोडून भाजपवासी झालेले माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी शुक्रवारी घरवापसी करत पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला आणि प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत आज गोंदिया येथे झालेल्या कार्यक्रमात अग्रवाल यांनी काँग्रेसचा झेंडा हातात घेतला.

गोपालदास अग्रवाल यांनी २०१९ ची विधानसभा निवडणूक भाजपच्या चिन्हावर लढवली होती. मात्र, अपक्ष उमेदवार विनोद अग्रवाल यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. आता २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपकडून पुन्हा विनोद अग्रवाल यांना उमेदवारी मिळणार असल्याने अग्रवाल यांनी भाजपला रामराम ठोकून पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आज त्यांना पक्षात प्रवेश दिला.

सुरुवातीपासून काँग्रेसमध्ये राहिलेल्या अग्रवाल यांनी २००४, २००९ आणि २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत सलग तीनवेळा विजय मिळवला होता. २०१४ च्या मोदी लाटेतही ते निवडून आले होते. मात्र, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. मात्र, भाजपकडून विधानसभेची उमेदवारी मिळूनही अग्रवाल यांचा पराभव झाला होता.

## जयदीप आपटे याला न्यायालयीन कोठडी

■ सावंतवाडी, दि. १३:
छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेला पुतळ्याचा शिल्पकार व मुख्य संशयित आरोपी जयदीप आपटे याला आज मालवण न्यायालयाने २४ सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्यानुसार त्याची रवानगी सावंतवाडी येथील उपजिल्हा कारागृहात करण्यात आली आहे.

## मी पोलिस किंवा शहांशी बोललो नाही

### हीट ॲन्ड रन : बावनकुळेंची स्पष्टोक्ती




■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १३:
भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा नागपूर हिट अँड रन प्रकरणाच्या तपासात आपण कोणताही हस्तक्षेप केला नसल्याचा पुनरुच्चार केला. मी माझ्या मुलासाठी पोलिसांवर कोणताही दबाव आणला नाही. मी दोन दिवस केंद्रीय गृहमंत्री अमित शहांसोबत होतो. पण त्यांच्याशीही हा विषय छेडला नाही, असे ते म्हणाले.

बावनकुळे यांच्या नेतृत्वात शुक्रवारी भाजपने अकोल्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या कथित आरक्षण विरोधी विधानाविरोधात निदर्शने केली. यावेळी पत्रकारांशी बोलताना बावनकुळे यांनी उपरोक्त दावा केला.

ते म्हणाले की, नागपूर येथील अपघाताप्रकरणी पोलिस चौकशीवर कोणताही दबाव येणार नाही. मी केव्हाही पोलिसांना फोन केला नाही. फक्त एकदा माहिती घेतली. पोलिसांनी या प्रकरणी आरोपी कुणाचाही मुलगा असला तरी त्याच्यावर योग्य ती कारवाई करावी.

## रोनाल्डोचे सोशल मीडियावर १०० कोटी फॉलोअर्स






■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३:
पोतुर्गालचा स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर १ अब्ज म्हणजेच १०० कोटी फॉलोअर्स असलेला जगातील पहिला व्यक्ती ठरला आहे. खुद्द रोनाल्डोने सोशल मीडिया पोस्टद्वारे ही माहिती दिली.

ही कामगिरी केल्यानंतर रोनाल्डोने गुरुवारी एक पोस्ट केली. या पोस्टच्या शेवटी लिहिले, माझ्यावर विश्वास ठेवल्याबद्दल, मला पाठिंबा दिल्याबद्दल आणि माझ्या जीवनाचा एक भाग बनल्याबद्दल धन्यवाद.

रोनाल्डोच्या सोशल मीडिया फॉलोअर्समध्ये इन्स्टाग्रामवर 600 दशलक्ष (60 कोटी) पेक्षा जास्त, एक्सवर 100 दशलक्ष (10 कोटी), फेसबूकवर 170 दशलक्ष (17 कोटी) आणि यूट्युबवर 60 दशलक्ष (6 कोटी) पेक्षा जास्त सबस्क्रायबर आहेत.
रोनाल्डो हा इंस्टाग्रामवर सर्वाधिक फॉलो केला जाणारा सेलिब्रिटी आहे. अर्जेंटिनाचा फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी दुसऱ्या स्थानावर आहे. त्याचे 500 दशलक्ष (50 कोटी) फॉलोअर्स आहेत.

रोनाल्डोने नुकतेच यूट्यूबवर त्याचे चॅनल सुरू केले. सध्या त्याचे यूट्युबवर 60 दशलक्ष (6 कोटी) पेक्षा जास्त सदस्य आहेत. रोनाल्डोने या वर्षी 5 सप्टेंबर रोजी क्रोएशियाविरुद्धच्या सामन्यात कारकिदीर्तील 900 वा गोल केला. अशी कामगिरी करणारा तो जगातील पहिला खेळाडू आहे.

## देवेंद्र फडणवीसांकडून भाजप नेत्यांना विजयाची त्रिसूत्री



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३:
विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या वतीने निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. फडणवीस यांच्या निवासस्थानी नेत्यांच्या रांगा लागल्या आहेत. या सर्व नेत्यांना विधानसभा निवडणुकीच्या दृष्टिकोनातून फडणवीस हे कानमंत्र देत आहेत. आपापल्या मतदारसंघात कामाला लागा, महायुतीतील नेत्यांच्या विरोधात अपशब्द वापरणे टाळा, असा सल्ला फडणवीस यांनी नेत्यांना दिला आहे.

राज्य सरकारच्या वतीने लाडकी बहीण योजनेसह इतर अनेक महत्त्वपूर्ण योजना सुरू करण्यात आल्या आहेत. या योजनांची माहिती अधिकाधिक मतदारसंघातील लोकांपर्यंत पोहोचा, अंतिम टप्प्यातील कामे मार्गी लावा, महायुती मधील नेत्यांच्या विरोधात अपशब्द वापरणे टाळा, असा सल्ला देखील त्यांनी त्यांना दिला आहे.

नेत्यांनी आपला जास्तीत जास्त वेळ मतदार संघात द्यावा, सरकारच्या प्रमुख योजना लोकांपर्यंत पोहोवाव्यात त्यांचा लाभ त्यांच्या मिळवून द्यावा, महायुतीतल्या नेत्यांबाबत अपशब्द टाळा, अशी त्रिसूत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजप आमदारांना दिली आहे. त्यासाठी लागेल ती मदत करण्यासाठी मी उभा आहे, असे आश्वासन देखील फडणवीस यांनी दिले आहे.

महायुतीतील जागा वाटप अद्याप झाले नसले तरी जास्तीत जास्त लढण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. लोकसभा निवडणुकीत फटका बसला असला तरी यावेळी सर्व त्रुटी दूर करून विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्णय भाजपच्या वतीने घेण्यात आला आहे.

# महापारेषणच्या पडघा ते अंबरनाथ अतिउच्च दाब वाहिनीवर तातडीचे काम

## अंबरनाथ व मोहने 100 केव्ही उपकेंद्रावरील काही भागाचा वीजपुरवठा शुक्रवारी बाधित

कल्याण, दि. १३ : प्रतिनिधी

महापारेषणच्या पडघा ते अंबरनाथ या अतिउच्च दाब वाहिनीवर शुक्रवारी (१३ सप्टेंबर २०२४) सकाळी ८ ते १० दरम्यान तुटलेल्या इन्सुलेटर स्ट्रिंगची दुरुस्ती करण्याचे अत्यंत तातडीचे काम करण्यात येणार आहे. परिणामी अंबरनाथ १०० केव्ही व मोहने १०० केव्ही उपकेंद्रातून वीजपुरवठा होणाऱ्या महावितरणच्या काही भागाचा वीजपुरवठा या कालावधीत बाधित होणार आहे. संबंधित ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.



अंबरनाथ १०० केव्ही उपकेंद्रावरील चिखलोली, सर्वोदय नगर, वसद, जांभुळ, आंबेशिव, वडवली, लादी नाका, गणेश चौक, बुवापाडा, संघटन चौक, फॉरेस्ट नाका, हेंद्रेपाडा, बाजारपेठ, एरंजाड गाव, सोनिवली, बारवी डॅम, बदलापूर गाव, दत्तनगर, सिद्धार्थनगर, बेलवली, सुभाषनगर, पोखरकर नगर, शांतीनगर, विद्यापीठ रोड, पवार सेक्शन, चिखलोली पाडा, गणेश घाट, कात्रप गाव, मोहन हायलँड, आयटीआय, एमजेपी, केमीकल एमआयडीसी, उल्हासनगर-४, अंबरनाथ पूर्व, कानसई गाव, भिडेवाडी, नवरेनगर, म्हाडा लोकनगरी, कैलासनगर, महालक्ष्मी नगर, शिरगाव या भागाचा वीजपुरवठा शुक्रवारी सकाळी ८ ते १० दरम्यान बंद राहणार आहे. तर मोहने १०० केव्ही उपकेंद्रावरील गोवेली, सी ब्लॉक, उल्हासनगर कॅंप-१ आणि कॅंप-२, एमआयडीसी वॉटर वर्क्स, उल्हासनगर पाणीपुरवठा, शहाड, मोहने, अटाळी, गाळेगाव, मांडा, आंबिवली आदी भागात शुक्रवारी सकाळी ७ ते १ दरम्यान वीजपुरवठा बंद राहणार आहे.

# यंदाचा गणेशोत्सव बचत गटांसाठी आर्थिक फलदायी

## विविध वस्तू आणि खाद्यपदार्थ विक्रीतून 15 लाखांहून अधिकची आर्थिक उलाढाल

ठाणे, दि. १३ : प्रतिनिधी

गणेश उत्सवासाठी लागणाऱ्या शोभेच्या वस्तू, मखर, विद्युत रोषणाई, हाताने बनविलेल्या फुलांच्या टोपल्या यांसह विविध खाद्य पदार्थांची यंदा महिला बचत गटांकडून मोठ्या प्रमाणात विक्री करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे नागरिकांकडूनही घरगुती वस्तूंनाच प्राधान्य दिले गेले असल्याने बचत गटांना यंदाचा गणेशोत्सव आर्थिक दृष्ट्या फलदायी ठरला असून जिल्ह्यातील महिला बचत गटांची सुमारे या वस्तू विक्रीतून १५ लाख रुपयांची आर्थिक उलाढाल झाली आहे.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, मुरबाड, शहापूर, कल्याण, भिवंडी या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बचत गट कार्यरत आहेत. जिल्ह्यातील बचत गटांची संख्या सुमारे दहा हजार इतकी असून यामध्ये एक लाख महिला जोडल्या गेल्या आहेत. मागील काही वर्षांमध्ये ठाणे जिल्ह्यातील या बचत गटांच्या माध्यमातून विविध लघुउद्योग, मध्यमउद्योग सुरू करण्यात आले आहेत. यातून बचत गटातील महिलांनाही एक सक्षम रोजगार उपलब्ध झाला आहे. तर या महिलांनी मिळून सुरू केलेल्या लघु आणि मध्यम उद्योगातून त्यांच्या आसपासच्या परिसरातील महिलांना देखील रोजगार उपलब्ध झाला आहे. गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी या उत्सवांच्या काळात या बचत गटांनी बनवलेल्या विविध वस्तूंना तसेच खाद्यपदार्थांना मोठी मागणी असते. गतवर्षीप्रमाणे यंदाच्या गणेशोत्सवात देखील या बचत गटांनी तयार केलेल्या विविध शोभेच्या वस्तूंना आणि खाद्यपदार्थांना मोठी मागणी आहे. उपहारगृहांमध्ये भेसळयुक्त मिठाईची भीती, मिठाईचे वाढलेले दर, तसेच फराळाच्या वाढलेल्या किंमती यामुळे यंदा अनेक भाविकांनी आणि मंडळांनी घरगुती पद्धतीने बनविलेल्या फराळ आणि मिठाईला पसंती दिली आहे.



यामध्ये बचत गटाने तयार केलेल्या खाद्यपदार्थांचा अधिकतर समावेश आहे. त्याचबरोबर बांबूसह इतर पर्यावरण पूरक गोष्टींचा वापर करून तयार करण्यात आलेल्या शोभेच्या वस्तूंची ही यंदा बचत गटांकडून मोठ्या प्रमाणात विक्री करण्यात आली आहे. यामुळे महिलांना मोठा आर्थिक लाभ झाला आहे. तसेच गणेशोत्सव सुरू होऊन अद्याप दोनच दिवस झाले आहेत. या कालावधीत महिला बचत गटांकडून वस्तू आणि खाद्य पदार्थांच्या विक्रीतून तब्बल १५ लाख रुपयांहून अधिकची आर्थिक उलाढाल करण्यात आली आहे. तर या महिलांनी तयार केलेल्या खाद्य पदार्थांना अद्यापही मागणी सुरूच असल्याची माहिती अंबरनाथ तसेच कल्याण येथील बचत गटांच्या महिलांनी सांगितले. यामध्ये विधवा आणि निराधार बचत गटांच्या देखील मोठ्या प्रमाणात समावेश आहे. या सर्व बचत गटांकडून मखर, कागदी फुलांच्या माळा, फुलांच्या टोपल्या, दिव्याचा वाती, तेल, अगरबत्ती, धूप, तूप यांसह विविध खाद्यपदार्थ यांची विक्री केली जात आहे.

### खेळते भांडवल मोलाचे

राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यातील महिला बचत गटांना जिल्हा परिषदेच्या वतीने खेळते भांडवल उपलब्ध करून देण्यात आले आहे. बचत गटांना झालेल्या या पतपुरवठ्यामुळे सर्व महिलांना त्यांचे लघु आणि मध्यम उद्योग अधिक सक्षम करण्यास मोठा हातभार लागला. त्यामुळे आज शेकडो बचत गट विविध उद्योगांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळवत असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी दिली आहे.

# कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित 245 ग्राहकांच्या घरात परतला 'प्रकाश'

## महावितरण अभय योजनेतून मिळवली वीजजोडणी; व्याजमाफीसह मूळ थकबाकीत सवलत



| मंडल कार्यालय | पात्र ग्राहक | मूळ थकबाकी | विलंब आकार | व्याज |
|---|---|---|---|---|
| कल्याण- एक | ३८,२१२ | ३३.८२ कोटी | ४२.८१ लाख | ३.७८ कोटी |
| कल्याण- दोन | ८८,१०२ | ९५.२५ कोटी | १.२१ कोटी | १८.४८ कोटी |
| वसई | १,०३,३०३ | १०३.७६ कोटी | १.३१ कोटी | ९.७६ कोटी |
| पालघर | ६४,४७४ | ६८.३५ कोटी | ८६.५२ लाख | ८.५८ कोटी |
| कल्याण परिमंडल | २,९४,०९१ | ३०१.१८ कोटी | ३.८१ कोटी | ४०.६१ कोटी |

कल्याण/वसई/पालघर, दि. १३ : प्रतिनिधी

वीजबिल थकबाकीमुळे वीजपुरवठा कायमस्वरुपी खंडित केलेल्या कल्याण परिमंडलातील २४५ ग्राहकांची घरे प्रकाशाने पुन्हा उजळली आहेत. या ग्राहकांनी व्याज व विलंब आकार शंभर टक्के माफीसह किमान ३० टक्के थकबाकी भरणाऱ्यांना त्वरित वीजजोडणीची संधी देणाऱ्या महावितरण अभय योजना-२०२४ चा लाभ घेत ही संधी साधली. १ सप्टेबरपासून या योजनेची सुरुवात झाली असून परिमंडलातील २ लाख ९४ हजार ९१ घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांना कायमस्वरुपी खंडित झालेला वीजपुरवठा पूर्ववत करण्याची संधी यातून मिळणार आहे. परिमंडलातील ३८९ ग्राहकांनी आत्तापर्यंत या योजनेचा लाभ घेतला असून उर्वरित ग्राहकांनीही योजनेत सहभागी होण्याचे आवाहन मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांनी केले आहे.

अभय योजनेनुसार मार्च-२०२४ अखेर किंवा तत्पूर्वी वीजपुरवठा कायमस्वरुपी खंडित झालेले लघुदाब व उच्चदाब ग्राहक (सार्वजनिक पाणीपुरवठा व कृषीपंप ग्राहक वगळून) योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. थकबाकीची मुळ रक्कम एकरकमी किंवा सहा समान हप्त्यात भरल्यास त्यावरील व्याज आणि विलंब आकार पुर्णतः माफ़ होईल. योजनेतील सहभागी ग्राहकांना एकरकमी किंवा सहा समान हप्त्यात मूळ थकबाकी भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे. तर थकबाकी एकरकमी भरणाऱ्या उच्चदाब ग्राहकांना मूळ थकबाकीवर ५ टक्के आणि लघुदाब ग्राहकांना १० टक्के अतिरिक्त सवलत मिळणार आहे. मूळ थकबाकी एकरकमी अथवा ३० टक्के रक्कम भरुन योजनेत सहभागी होता येईल. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यकतेनुसार तत्काळ नवीन वीजजोडणी मिळेल. ३० टक्के रक्कम भरणाऱ्या ग्राहकांना मूळ थकबाकी व्याजमुक्त अशा सहा समान हप्त्यात भरण्याची सवलत उपलब्ध आहे.

कल्याण परिमंलातील २ लाख ९४ हजार ९१ ग्राहक या योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. योजनेत सहभाग घेत या ग्राहकांना विलंब आकाराचे ३ कोटी ८१ लाख व व्याजाचे ४० कोटी ६१ लाख रुपयांची सवलत मिळवण्याची संधी आहे. त्यासाठी पात्र ग्राहकांनी https://wss.mahadiscom.in/wss/wss या पोर्टलवर केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे. याशिवाय महावितरणच्या स्थानिक कार्यालयांमध्ये इच्छुक ग्राहकांना ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. थकबाकीपोटी कायमचा वीजपुरवठा खंडित झालेल्या संबंधित ग्राहकांनी अधिकाधिक संख्येने या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# सरकारच्या अनास्थेमुळे नाभिक समाजाने उपसले आंदोलनाचे हत्यार

उल्हासनगर दि. १३ : प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यात विविध योजनांची अंमलबजावणी होत असून सर्वच स्तरावरील समाज घटकांसाठी शासन अनेक योजना राबवित आहे.मात्र,नाभिक समाजाला आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी आजही संघर्ष करावा लागतोय ही एक मोठी शोकांतिका आहे.एकिकडे राज्यात सरकारच्या वतीने विविध समाज घटकांना योजनांचा लाभ दिला जातोय मात्र, दुसरीकडे आताही नाभिक समाजाला आपला उदरनिर्वाह चालवण्यासाठी केशकर्तनालय सुरू करण्याकरिता लागणारे भांडवल गोळा करताना बँकेच्या पायऱ्या झिजवाव्या लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. राज्यात नाभिक समाजाची लोकसंख्या अंदाजे ४५ लाखांच्या आसपास आहे. नाभिक समाज शहर आणि लहान-मोठ्या गावखेड्यांमध्ये विखुरलेला आहे.त्यातील ८० ते ९० टक्के समाजबांधव आजही आपला पारंपरिक केशकर्तनाचा व्यवसाय करतात. तर काही मोजके सरकारी नोकरीच्या क्षेत्रात आहेत.यांचा टक्का ०.२ इतका आहे.८० ते ९० टक्के इतक्या मोठ्या प्रमाणात आपल्या पारंपरिक केशकर्तनाच्या व्यवसायात कार्यरत असलेल्या समाजाला सहाय्यभूत ठरणाऱ्या कोणत्याही शासकीय सुविधा महाराष्ट्रात उपलब्ध नाहीत. त्याचा फटका नाभिक समाजाला बसत असून याविरोधात समाजात रोष दिसून येत आहे.

आतापर्यंत सनदशीर मार्गाने नाभिक समाजाने वारंवार राज्य शासनाला, शासनातील वरिष्ठ मंत्र्यांना निवेदने देत आपल्या मागण्या व अडचणी यांचे सादरीकरण केले. मात्र, गृहित धरल्याप्रमाणे शासनाने नाभिक समाजाच्या मागण्यांना केराची टोपली दाखविली. त्यामुळे आता नाभिक समाजाने रस्त्यावर येत आपले म्हणणे मांडण्यास सुरुवात केली आहे.येत्या ३० सप्टेंबर रोजी सकल नाभिक समाजाच्या वतीने आझाद मैदानात एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात नाभिक समाज आझाद मैदानावर एकवटून सरकार विरोधात आपला रोष व्यक्त करणार आहे.त्यामुळे नाभिक समजाला वाली कोण? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत असून सरकारच्या अनास्थेमुळे नाभिक समाजाने आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. त्यामुळे आता तरी शासन नाभिक समाजाकडे लक्ष देणार काय? हा प्रश्न उपस्थित होत आहे. ही माहीती उल्हासनगर येथील सकल नाभिक समाजाचे नेते मनोज कोरडे यांनी दिली आहे.

# महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-2019

## प्रोत्साहनपर लाभासाठी आधार प्रमाणिकरणास 18 सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

देवळाली कॅम्प, दि.१३ : प्रतिनिधी

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-2019 अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणिकरण न केलेल्या जिल्ह्यातील 1 हजार 226 शेतकऱ्यांना आधार प्रमाणिकरणासाठी शासनाच्या संगणक प्रणालीवर 12 ऑगस्ट ते 7 सप्टेंबर 2024 या कालावधीत उपलब्ध करून देण्यात आली होती. या कालावधीत 742 शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केले असून 484 शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण प्रलंबित आहे. या शेतकऱ्यांसाठी आधार प्रमाणिकरणाची मुदत 18 सप्टेंबर 2024 वाढविण्यात आली असल्याचे जिल्हा उपनिबंधक फयाज मुलाणी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-2019 अंतर्गत अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेच्या कालावधीत बँकांकडून पीक कर्ज घेवून नियमित परतफेड करणाऱ्या काही लाभार्थी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरणापूर्वीच निधन झाले आहे. त्यांना प्रोत्साहनपर लाभ रक्कमही अदा करण्यात आलेली नाही. अशा मृत झालेल्या शेतकऱ्यांच्या कर्ज खात्याबाबत करावयाच्या कार्यवाहीसाठी आदर्श कार्यपद्धती महा-आयटीकडून प्राप्त झाली आहे. या कार्यपद्धतीनुसार जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत, खासगी, व्यापारी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी खालील नमूद कालावधीत बँक स्तरावर कार्यवाही करावयाची आहे, अशा सूचना जिल्हा उपनिबंधक श्री. मुलाणी यांनी केल्या आहेत.

बँकाना मृत शेतकऱ्यांच्या कर्ज खात्याची माहिती योजनेच्या संगणकीय प्रणालीवरून काढून टाकण्याची सुविधा 9 ते 17 सप्टेंबर 2024 या कालावधीत उपलब्ध राहणार असून मृत तकऱ्यांच्या वारसाची नोंद संबंधित कर्जखात्यास करून त्याबाबतची माहिती संगणकीय प्रणालीवर सादर करण्याची सुविधा 18 ते 26 सप्टेंबर 2024 या कालावधीत उपलब्ध राहणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# गणेशोत्सवाचे औचित्य साधत जिजाऊ संस्थेच्यावतीने 5 मोफत रुग्णवाहिकांचे लोकार्पण

## जिजाऊ संस्था आपल्या कुटुंबाप्रमाणे आपली काळजी घेईल – निलेश सांबरे

जव्हार दि. १३ : प्रतिनिधी

गणेशोत्सवाचे औचित्य साधत जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने दुर्गम भागांत असलेल्या गोर गरीब जनतेच्या आरोग्यसेवेच्या दृष्टीने ठाणेसह पालघर जिल्ह्यातील विविध भागांत 5 मोफत रुग्णवाहिकांचे लोकार्पण आज जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांच्या हस्ते झडपोली येथे पार पडलेल्या कार्यक्रमात करण्यात आले.

जिजाऊ संस्था ही गेली 15 वर्षे आरोग्य ,शिक्षण ,रोजगार ,महिला सक्षमीकरण आणि शेती या विषयांवर कोकणातील पालघर ,ठाणे ,रायगड ,रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या 5 जिल्ह्यात स्वखर्चाने मोफत उपक्रम राबवत समाजसेवा करत आहे . शासन करेल तेव्हा करेल पण समाजाचे एक घटक म्हणुन समाजासाठी योगदान देणे हे आपले देखील कर्तव्य आहे. म्हणुनच जिजाऊ संस्त्हा जिथे जिथे शक्य आहे तिथे तिथे पोहचुन आपले सामाजिक कर्तव्य पार पाडत आहे.याच अनुषांगाने आज कल्याण तालुक्यासाठी 2 कसारा येथे 1 जव्हार येथे 1 आणि पालघर/सफाळे/नालासोपारा येथे 1 अश्या 5 मोफत रुग्णवाहिकांचे लोकार्पण जिजाऊ संस्थेच्या वतीने करण्यात आल्याचे यावेळी जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांनी कार्यक्रमाप्रसंगी बोलताना सांगितले . पालघर तसेच ठाणे जिल्ह्यातल्या दुर्गम भागांत जिजाऊ संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या मोफत रुग्णवाहिका या गरीबातल्या गरीब रुग्णाकडून एकही रुपया न घेता सेवा पुरवतील असे देखील यावेळी सांबरे यांनी सांगितले . याआधीही 21 रुग्णवाहिका जिजाऊ संस्थेच्या वतीने धुळे जिल्हा तसेच कोकणभर समाजच्या सेवेसाठी देण्यात आलेल्या आहेत. यात आणखी 5 रुग्णवाहिका आज समाजासाठी मोफत लोकार्पण करण्यात आलेल्या आहेत. एकूण 26 रुग्णवाहिका या जिथे जिथे समाजाच्या सेवेसाठी गरज पडेल तिथे तिथे पुरवण्यात येतील ,त्याचबरोबर जिजाऊ संस्थेशी संपर्क केल्यानंतर संस्थेच्या भगवान महादेव सांबरे रुग्णालयात गरजू रुग्णाला मोफत उपचार मिळतील तसेच गरज पडल्यास शासकीय रुग्णालयातही जिजाऊ कडून उपचार मिळवून देण्यासाठी जिजाऊचे स्वयंमसेवक आपल्या मदतीला असतील असे सांबरे यांनी यावेळी आश्वासित केले.



उपचारासाठी लाखो रुपयांची बिले भरण्याकरीता हतबल न होता जिजाऊ संस्थेचे सहकार्य घ्या ही संस्था आपल्या कुटुंबाप्रमाणे आपली काळजी घेईल असे आवाहन सांबरे यांनी नागरिकांना या निमित्ताने केले आहे.

# गणेशोत्सवातील आनंदाचा शिधा लाटला; शिधा विकण्यासाठी नेत असताना जप्त, दोघांवर गुन्हा

अंबरनाथ, दि.१३ : प्रतिनिधी

राज्यातील गोरगरीब जनतेला सण उत्सवांच्या काळात मदत म्हणून अवघ्या शंभर रूपयात सहा जिन्नस असलेला एक अन्न धान्याचा संच दिला जातो. परंतु या संचातील शिधा काळाबाजारात विकण्यासाठी नेला जात असल्याचा धक्कादायक प्रकार अंबरनाथमध्ये समोर आला आहे. सामाजीक कार्यकर्त्यांच्या सतर्कतेमुळे हा साठा पकडण्यात आला. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून शिधावाटप दुकानाला टाळे ठोकण्यात आले आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून काही सण उत्सवांच्या काळात अंत्योदय शिधापत्रिका असणाऱ्यांना सहा अन्न धान्य असलेला एक संच सवलतीच्या दरात म्हणजे शंभर रूपयांत दिला जातो. त्यामुळे सण उत्सवांच्या काळात गोरगरीब जनतेला त्याचा फायदा होता. आचारसंहितेमुळे गेल्या तीन महिन्यात हा शिधा देता आला नव्हता. त्यामुळे आता गणेशोत्सवाच्या तोंडावर हा शिधा देण्याचा निर्णय घेण्यात आला. अंबरनाथ शहरातही अशाप्रकारे आनंदाचा शिधा आणि पंतप्रधान योजनेतील शिधा शिधावाटप दुकानांमध्ये देण्यासाठी आला होता. येथील पूर्वेतील महालक्ष्मी नगर येथील शिधावाटप दुकान क्रमांक ४६ एफ १ या दुकानातील हा शिधा एका टेम्पोमधून बाजारात विक्रीसाठी नेला जात होता. याची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते प्रवीण गोसावी यांनी हा टेम्पो अडवून हा गैरप्रकार उघडकीस आणला. याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी टेम्पो आणि त्यातील शिधा जप्त केला. शिवाजीनगर पोलिस ठाण्यात याप्रकरणी सुभाष भारती आणि कुदनकुमार गुप्ता या दोघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी चार लाख ३५ हजार रूपयांचे विविध अन्न धान्य जप्त केले आहे. अपहार करण्यात आलेल्या अन्नधान्याच्या साठ्यात एक लाख १४ हजार रुपयांचा २ हजार ८७५ किलो तांदूळ, ५ हजार ५७० रुपये किमतीचे प्रधानमंत्री पिशवी ५५७ नग, अंत्योदय साखर १० किलो, साडी २ नग, ७०० रुपये, ७६,५०० रुपये किमतीचा आनंदाचा शिधा यात रवा, साखर, चनाडाळ, तेल प्रत्येकी एक किलो, २७ हजार रूपये किमतीचा आनंदाचा शिधा प्रकारातील २७० नग तेल अशा जिन्नसाचा समावेश आहे.

# भाजीपाल्याची गाडी लावण्यावरुन दोन विक्रेत्यांमध्ये रक्तरंजित राडा ; एका विक्रेत्यास अटक

भिवंडी दि. १३ : प्रतिनिधी

दोन भाजीपाला विक्रेत्यांमध्ये भाजीपाल्याची गाडी लावण्यावरून झालेल्या वादातून रक्तरंजित राडा होऊन एका विक्रेत्याने दुसऱ्याला लाकडी बांबूने डोक्यात मारून गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे.तर याप्रकरणी निजामपूरा पोलिस ठाण्यात दुसऱ्या भाजीपाला विक्रेत्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास अटक करण्यात आली आहे.शिवम किशोरीलाल केशरवाणी (१९) असे अटक केल्याचे नाव आहे.तर गौतम रमेशचंद जैस्वाल (१९) असे हल्ल्यात जखमी झालेल्या भाजीपाला विक्रेत्याचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,आरोपी शिवम हा भिवंडी महापालिका परिसरातील काप आळीतील मोरे बिल्डिंग मध्ये राहत आहे.तर जखमी गौतम हा कोंबडपाड्यातील पंचवटीच्या बाजूकडील जिजामाता चाळीत भाड्याच्या खोलीत राहत आहे.या दोघांचाही भाजीपाला विक्रीचा व्यवसाय असून दोघेही बाजारपेठेतील भाजी मार्केट मध्ये भाजीपाल्याची गाडी लावत आहेत.दरम्यान १० सप्टेंबर रोजी पहाटे साडे पाच वाजताच्या सुमारास भाजी मार्केट मधील जय मल्हार हॉटेल समोर भाजी पाल्याचे दुकान लावण्याच्या जागेवरून दोघांमध्ये शिवीगाळसह धक्काबुक्कीने शाब्दिक बाचाबाची झाली.त्यानंतर आरोपी शिवमने त्याच्या बाजूला पडलेल्या लाकडी बांबूच्या तुकड्याने गौतमच्या डोक्यात मारून त्यास रक्तरंजित केले आहे.त्यामुळे याप्रकरणी जखमी गौतमच्या फिर्यादीवरून शिवमच्या विरोधात निजामपूरा पोलिस ठाण्यात भान्यासं कलम ११८(१),३५२ न्वये गुन्हा दाखल करून त्यास अटक करून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम ३५ (०३) नुसार नोटीस देवून सोडून देण्यात आले आहे.पुढील तपास पोउनि पाथरे करीत आहेत.

# सावत्र भावाची हत्या करणाऱ्यास सश्रम कारावास

कल्याण दि. १३ : प्रतिनिधी

जमिनीच्या वादातून सावत्र भावाला लोखंडी सळईने मारहाण करून त्याची हत्या करणाऱ्यास कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्र. र. अष्टुकर यांनी १० वर्ष सश्रम कारावास आणि पाच हजार रूपये दंडाची शिक्षा ठोठावली.

विष्णु राजाराम रामगुडे असे कारावास झालेल्या आरोपीचे नाव आहे. तुकाराम रामगुडे असे मृताचे नाव आहे. हे दोघे सावत्र भाऊ आहेत. रामगुडे कुटुंब उल्हासनगर येथे राहते. तुकाराम हे अंबरनाथ येथील ऑर्डनन्स फॅक्टरीत नोकरीला होते. विष्णु आणि तुकाराम यांच्यात जमिनीवरून वाद सुरू होता. जानेवारी २०१७ मध्ये तुकाराम रामगुडे ऑर्डनन्स फॅक्टरीतून रात्रपाळी करून घरी आले होते. ते घरात बसले होते. त्यावेळी विष्णु रामगुडे तुकाराम यांच्या घराबाहेर येऊन शिवीगाळ करू लागला. तुकाराम यांनी घराबाहेर जाऊन विष्णु यांना तू शिवीगाळ कशासाठी आणि कोणाला करतो, असा प्रश्न केला. त्याचा राग विष्णुला आला. त्याने हातामधील लोखंडी सळईने तुकाराम यांच्यावर हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने विष्णुने हा हल्ला केला होता, असे तुकारामची पत्नी वंदना यांनी पोलीस, न्यायालयातील जबाबात म्हटले आहे.

या झटापटीच्यावेळी तुकाराम यांची पत्नी मध्ये पडून तुकाराम यांना विष्णुच्या मारहाणीपासून वाचविले. लोखंडी सळईचे घाव वर्मी बसल्याने तुकाराम रक्ताच्या थारोळ्यात पडले. त्यांना मध्यवर्ति रुग्णालय, तेथून खासगी रुग्णालयांमध्ये हलविण्यात आले. डोंबिवलीतील एम्स रुग्णालयात उपचार सुरू असताना काही महिन्यांनी तुकाराम यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. कल्याण न्यायालयात पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले होते. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून सबळ पुराव्यांच्या आधारे विष्णु रामगुडे याला १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे ॲड. एस. आर. कुलकर्णी, ॲड. इघारे, आरोपीतर्फे ॲड. भोपी यांनी काम पाहिले. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक एस. पी. आहेर, हवालदार के. पी. घरत यांनी केला होता.

# ऐरोली विभागात अतिक्रमण विभागाची कारवाई

नवी मुंबई, दि. १३ : प्रतिनिधी

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत सागरनाथ रामा मढवी, घर नं - 30 ,मच्छी मार्केटच्या मागे, दिवा गाव ,सेक्टर – 9 , ऐरोली येथील आरसीसी इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु केले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 54 अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.1591/2023 च्या आदेशानुसार आज रोजी तिसऱ्या मजल्याचे बांधकाम अंशत: निष्कासीत करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. सदर ठिकाणी पोकलेन, जेसीबी सारखी मशनरी जावु शकत नसल्याने या मोहिमेसाठी 10 हॅमर, 8 ब्रेकर, व 18 मजूर यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली येथील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# केंद्राचा शरद पवारांना जवळ करण्याचा प्रयत्न

राज्यातील सत्ता संघर्षानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत अनेक राजकीय समीकरणे बदलली आहेत. त्यातच आता लोकसभा सचिवालयाच्या वतीने विविध पक्षांना संसदेत कार्यालयाचे वाटप करण्यात आले आहे. मात्र, यात पक्षांच्या नावाचा जो उल्लेख केला आहे, त्यावरुन राज्यातील राजकारण चांगलेच तापणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

लोकसभेत सचिवालयाच्या वतीने पक्षांच्या संख्याबळानुसार कार्यालयाचे वाटप केले जाते. त्यामध्ये शरद पवारांच्या पक्षाला कार्यालय देण्यात आले आहे. मात्र, अजित पवार यांच्या पक्षाला संख्या बळाअभावी कार्यालय मिळालेले नाही.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे या कार्यालयाच्या यादीमध्ये लोकसभेच्या सचिवालयाने शरद पवार यांच्या पक्षाचा उल्लेख नॅशनल काँग्रेस पार्टी अर्थात एनसीपी असा केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हेच मूळ नाव आहे. मात्र, पक्ष फुटीनंतर हे नाव अजित पवार यांना मिळाला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार असे नाव शरद पवार यांच्या पक्षाला मिळाले होते.

दुसरीकडे शिवसेनाचा उल्लेख करताना शिवसेना शिंदे असा करण्यात आला आहे. तर उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नाव मिळाले आहे. शिवसेनेच्या बाबतीमध्ये शिवसेनेला या पूर्वी मिळालेले जुन्या संसद भवनातील 128 क्रमांकाचे दालन शिंदे यांच्या पक्षाला मिळाले आहे.

गेल्या वेळी देखील शिवसेनेला हेच कार्यालय मिळाले होते. मात्र यावेळी हे कार्यालया शिवसेना शिंदे या पक्षाला देण्यात आले आहे. तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला 128 ए हे दालन देण्यात आले आहे.



राज्यात सत्ता संघषानंतर अनेक राजकीय घडामोडी घडल्या आहेत. त्यात लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला स्वबळावर पूर्ण बहुमत मिळाले नसले तरी मित्र पक्षांच्या मदतीने त्यांनी सरकार स्थापन केले आहे. यामध्ये टीडीपी हा पक्ष नव्या संसद भवनामध्ये कार्यालय मिळवणारा पहिला पक्ष ठरला आहे.

तेलगू देसम हा सध्या भारतीय जनता पक्षाचा सहकारी मित्र पक्ष आहे. पक्षाचे प्रमुख आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू हे सध्या सरकारमध्ये सहभागी आहेत. याशिवाय शिंदे यांच्या सात खासदारांचा पाठिंबा देखील सरकारला मिळाला आहे. नितेश कुमार यांच्या पक्षाला देखील संविधान सदन मध्ये जागा देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील विधानसभा हेरून शरद पवारांना जवळ करण्याचा केंद्रातील हा डाव असल्याचे बोलले जाते.

### निवडणुकीच्या गदारोळात खोऱ्यात शांतता

श्रीनगर डाउनटाउन. हाच भाग, जो 2019 पूर्वी काश्मीरमध्ये दगडफेक आणि हिंसाचाराचे प्रमुख केंद्र होता. पण, जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या गदारोळात, येथे पसरलेली शांतता आश्चर्यकारक आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे काश्मिरी पंडित.

प्रत्यक्षात येथे 3 जागा आहेत. त्यापैकी एक हब्बा कादल आहे, जिथे एकूण 92 हजार मतदारांपैकी 25 हजार काश्मिरी पंडित आहेत, परंतु, कुटुंबे फक्त 100 आहेत आणि त्यांचीही या निवडणुकीत महत्त्वाची भूमिका आहे. उर्वरित मतदार जम्मू किंवा इतर राज्यांतील जगती बस्ती येथे स्थायिक आहेत, जे तेथे बांधलेल्या मतदान केंद्रात मतदान करतील.

संपूर्ण काश्मीरमध्ये 8 जागा आहेत, जिथे काश्मिरी पंडित मतदार 8% ते 25% पर्यंत आहेत. त्यापैकी केवळ 6 हजार खो?्यात आहेत. उर्वरित जम्मू आणि देशाच्या इतर भागात आहेत.

हब्बा कडालमध्ये फेरफटका मारल्यास, इथे ना निवडणुकीचे बॅनर, ना पोस्टर, ना ढोल-ताशे दिसणार नाहीत. याचे कारण 76 वर्षीय पंडित मकबूल भट यांनी सांगितले. ते म्हणाले, आम्ही स्वप्नात जगणे सोडून दिले, राजकीय आश्वासनांमध्ये सहा वर्षे गेली. आम्ही तिथेच आहोत. 2019 पासून एकही काश्मिरी पंडित स्वतःहून खो?्यात परतला नाही, परंतु सरकार त्यांना स्थलांतरित म्हणत परत आणत आहे. 1990 च्या हिंसाचारातही ज्यांनी काश्मीर सोडले नाही, त्यांना नोकऱ्या आणि सरकारी सुविधा दिल्या जात आहेत, त्यांचे ऐकले जात नाही.

निवडणुकांमध्ये स्थलांतरित विरुद्ध स्थानिक काश्मिरी पंडितांचा मुद्दा आहे का, असे विचारले असता, भट म्हणाले कोविडनंतर असेच आहे. आपल्या गरजा आपल्या आहेत... धर्मावर नाही, वीज, पाणी, रुग्णालये देणाऱ्यांना आम्ही मतदान करू

दक्षिण काश्मीरमधील पुलवामा मतदारसंघात 8000 पंडित मतदार आहेत. तर राजपोरामध्ये 9 हजार. राजपोरामध्ये दोन काश्मिरी पंडित रिंगणात आहेत. अनंतनाग जिल्ह्यातील शांगूस मतदारसंघात 10 हजार पंडित मतदार आहेत.

येथील अनिल कौल म्हणाले की, वीज, पाणी आणि उत्तम आरोग्य सेवा या मुस्लीम आणि हिंदूंसाठी महत्त्वाच्या आहेत, कारण त्यांच्याशिवाय आपण जगत आहोत. पुलवामा येथील जानकी नाथ म्हणतात की, आम्ही धर्माच्या आधारावर मतदान करणार नाही, आम्ही फक्त त्यालाच निवडू जो आमच्या मूलभूत गरजा पूर्ण करेल. बारामुल्ला, सोपोर, बिरवाह या जागांवरही काश्मिरी पंडित मतदार 10% पर्यंत आहेत.

1990 च्या हिंसाचारात जीव वाचवून जम्मूला पोहोचलेल्या जानकी कौल म्हणतात की, खोऱ्यात आम्हाला पूर्ण सन्मानाने पुनर्वसन हवे आहे. अनेक दशकांपासून संपूर्ण पंडित समाज याची वाट पाहत आहे. आता आमच्याकडे आलेले सर्वच उमेदवार पुनर्वसनाचे आश्वासन देत आहेत, पण आश्वासने ऐकून आमची मुले मोठी झाली आहेत.

निवडणुकीच्या पहिल्या दोन टप्प्यात, 14 काश्मिरी पंडित उमेदवारांनी (2014 मध्ये 8) काश्मीरमध्ये उमेदवार उभे केले आहेत, त्यापैकी 6 हब्बा कादलमध्ये आहेत. 25 सप्टेंबर रोजी मतदान आहे. 1990 पूर्वी पंडित हे एकमेव आमदार होते, मात्र दोन निवडणुकांपासून ही जागा नॅशनल कॉन्फरन्सच्या खात्यात आली आहे. मैसुमा हब्बा कादलच्या पुढे आहे. येथेही पंडितांची निराशा झाली आहे. हा परिसरही काश्मीरच्या स्वातंत्र्याच्या घोषणांनी गुंजत होता, पण इथेही काश्मिरी पंडितांची निराशा झाली आहे.

46 वर्षीय सुनैना पंडित सांगतात की, आम्ही शांततेने जगत आहोत, त्यामुळे आम्हीही शांततेने निवडणुकीत भाग घेत आहोत. भाजपने केवळ 50 टक्केच अपेक्षा पूर्ण केल्या आहेत.

# विश्व बंधुत्व दिन चिरायु होवो



कृष्णाकुमार आनंदी-गोविंदा निकोडे
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
9423714883

कालचा १३ सप्टेंबरचा दिवस जगाच्या इतिहासात संस्मरणीय ठरणारा आहे, कारण दि. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर दहशतवादी हल्ला झाला. भारतासह अनेक देशांत दहशतवादाचा धोका सतावत आहे आणि त्यापैकी अनेक देशांत नित्य दहशतवादी हल्ले होत आहेत पण अमेरिकेवर असा हल्ला व्हावा ही घटना विशेष आहे कारण अमेरिका हे समर्थ राष्ट्र आहे.

अमेरिकेची सुरक्षा व्यवस्था कडक आहे. या देशात शिरकाव करून घेऊन दहशतवादी कारवाया करणे मोठे कठीणच. पण ओसामा बिन लादेन या अतिरेक्याने हे साहस केले. दोन विमाने अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनच्या अनेक मजली इमारतींवर धडकवले. त्यात दोनशेपेक्षाही अधिक लोक ठार झाले आणि या दोन मोठ्या इमारती जमीनदोस्त झाल्या. या इमारतीच्या निमित्ताने दहशतवादी संघटनांनी अमेरिकेचा तोरा आणि शान जमीनदोस्त केली. अमेरिकेच्या कडक सुरक्षा व्यवस्थेलाही भेदून हे काम मुठभर तरुण करू शकतात, हे जगाने पाहिले.

एवढ्या समर्थ आणि सुसज्ज देशातल्या करोडो लोकांची झोप हराम करण्याचे काम हाताच्या बोटावर मोजता येईल, एवढे तरुण हराम करू शकतात. हे जगाने अनुभवले. १३ सप्टेंबर ही तारीख म्हणूनच जगाच्या इतिहासात अजरामर झाली आहे. आपण ही तारीख लक्षात ठेवली पाहिजे कारण याच तारखेला- दि.१३ सप्टेंबर १८९३ साली स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेतल्या शिकागो शहरात झालेल्या जागतिक सर्वधर्म परिषदेत त्यांचे जगात गाजलेले भाषण केले होते.

स्वामीजी हे त्यावेळी २८ वर्षांचे म्हणजे तरुण होते. त्यांनी शिकागोच्या परिषदेत आपला परिचय करून देणारे चारच मिनिटांचे भाषण केले होते. त्यात त्यांनी तिथल्या श्रोत्यांना असे काही मंत्रमुग्ध करून टाकले की त्याच्या दुसऱ्या दिवशीच्या अमेरिकेतल्या सगळ्या वृत्तपत्रांनी त्यांचा उल्लेख योद्धा सन्याशी अशा शब्दात केले होते.

अमेरिकेतल्या लोकांनी ही परिषद जगातल्या सगळ्या धर्मांची म्हणून आयोजित केली होती. अमेरिकेचा शोध १४९३ साली लागला होता आणि त्याला ४०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल हे आयोजन करण्यात आले होते. जगातल्या सगळ्या धर्मांनी आपापल्या धर्मांची माहिती या परिषदेत द्यावी म्हणजे जगातले सगळेच धर्म मानवतेचाच संदेश देत असतात, हे सत्य जगाला समजेल असा आपला हेतू असल्याचे आयोजकांनी म्हटले होते, पण ही परिषद एका मोठ्या आयोजनाचा एक भाग होती. तिथे अमेरिकेने केलेल्या वैज्ञानिक प्रगतीचे दर्शन घडवणारे प्रदर्शनही भरवण्यात आले होते.

या प्रदर्शनातून आपल्या प्रदर्शनाचे दर्शन घडवावे असाही हेतू या सगळ्या आयोजनामागे होताच पण सर्वधर्म परिषदेत सगळ्यांनी आपापल्या धमार्ची माहिती दिली तरीही शेवटी आयोजकांच्या खिश्चन धर्माचाच प्रभाव या परिषदेवर राहील असा अमेरिकेच्या लोकांचा विश्वास होता.

एकुणात जगात खिश्चन धर्म सर्वात श्रेष्ठ आहे हे जगाच्या मनावर बिंबवावे, असा त्यांचा अंतःस्थ हेतू होता. त्यामागे गर्व होता, ताठा होता आणि तोरा होता. पण स्वामी विवेकानंदांनी त्यांच्या या तोऱ्याचे मनोरे आपल्या केवळ चार मिनिटांच्या भाषणाने जमीनदोस्त केले. परिषदेला आलेला प्रत्येक प्रतिनिधी आपलाच धर्म कसा श्रेष्ठ आहे हे सांगण्याचा प्रयत्न करीत होता पण, स्वामीजींनी आपला हिंदू धर्म जगातल्या सर्वच धर्मांना समान मानतो. कोणताही धर्म श्रेष्ठ नाही आणि कोणताच धर्म कनिष्ठ नाही ही हिंदू धर्माची धारणा आहे असे स्वामीजींनी म्हटले.

आकाशातून पडणारे पाणी अनेक ओढ्यांतून आणि शेकडो नद्यांतून वहात जात असले तरीही शेवटी ते समुद्रालाच मिळते तसा कोणत्याही धमार्ने कोणत्याही प्रकारे ईश्वराची आराधना केली तरीही शेवटी ती आराधना एकाच ईश्वराला प्राप्त होते, असे ते म्हणाले.

आपले हे भाषण संपताना स्वामीजींनी सगळे धर्म हे सारखेच आहेत याचा अर्थ आपण कोणीही आपल्या धर्माचा अतिरेकी अभिमान बाळगणे आणि कोणीही कोणाच्याही धर्माचा द्वेष करणे हे अनाठायी आहे, असे प्रतिपादन केले. जगातल्या सगळ्या धर्मांनी मानवताच शिकवली आहे म्हणून जगातल्या सर्वच धर्मांचे लोक आपल्या मनात ही भावना बाळगतील तर जगातले अनेकानेक धर्मांचे अनुयायी आपल्या धर्माचा अभिमान बाळगण्यासोबतच इतरांच्याही धर्माचा आदर करायला शिकतील. त्यातूनच विश्वबंधुत्वाची कल्पना बळावेल आणि जगात शांती नांदेल असा विश्वास स्वामीजींनी व्यक्त केला.

ओसामा बिन लादेन याने सन २००१ साली अमेरिकेचा तोरा उतरवला पण त्यासाठी त्याच्या तरुण अनुयायांनी हिंसेचा वापर केला, पण स्वामीजींनी अमेरिकेचा तोरा आपल्या केवळ चार मिनिटांच्या भाषणाने म्हणजेच कसल्याही शस्त्राचा वापर न करता केवळ आपल्या बुद्धीमत्तेच्या साह्याने उतरवला. म्हणून १३ सप्टेंबर हा दिवस जगात विवेकानंद केन्द्राच्या वतिने विश्वबंधुत्व दिवस म्हणून साजरा होत असतो.

ओसामा बिन लादेनच्या हिंसाचारी प्रयत्नांमुळे अमेरिकेला धडा मिळाला पण त्यातून त्याच्या देशाचे अमेरिकेशी कायमचे वितुष्ट आले. स्वामीजींच्या प्रयत्नाने मात्र भारत आणि अमेरिका यांच्यातले संबंध अधिक सलोख्याचे आणि मैत्रीचे झाले. दोन देशातले शत्रुत्व न वाढता प्रेम वाढले. बंधुत्व वाढले.

# स्वयंप्रेरणेने धर्मांतर करणाऱ्या रूपाताई



भाग ३

अरुणा सबाने
9970095562

दुसरीकडे त्यांचा बुद्धाचा अभ्यासही सुरू होता. फुले/ शाहू / आंबेडकरी विचारांना घेऊनच त्या पुढे जात होत्या. एकाच वेळी दोन टोकाचे वाचन त्यांचे सुरू असायचे. मात्र मनावर प्रभाव बुद्धाच्या विचारांचाच होत होता. बाबरी मस्जिद पडल्यानंतर हा विचार जास्त प्रबळ झाला.

अनेक दिवसांपासून मनात घोळत असलेला विचार कृतीत आणण्याची संधी चालून आली होती. ताई दुसऱ्या दिवशी नागपुरात कार्यक्रम स्थळी म्हणजेच धनवटे रंगमंदिर बर्डी येथे गेल्या. त्या कार्यक्रमात दार्जिलिंगहून आलेल्या भंतेजींकडून भन्ते धम्मविधी आणि संघप्रिय गौतम यांच्याकडून ताईंना त्रिसरण पंचशीला पाठोपाठ धम्मदीक्षा देण्यात आली. अर्थात ताईंच्या इच्छेने.

ही ताईंच्या आयुष्यातली फार मोठी घटना होती. एक कुलकर्णी घरात जन्माला आलेली मुलगी चक्क बोधी होते. रूपा बोधी होते ही घटना एक दिवसातला विचार किंवा कृती असूच शकत नाही. त्यामागे त्यांचा अभ्यास, चिंतन आणि मुख्य म्हणजे मनानं आधी संपूर्ण बोधीमय होणं आहे. बुद्धाच्या विचारांचा पगडा असणं आणि प्रत्यक्ष ते विचार आचरणात आणून संपूर्णपणे बुध्दमय होणं हे फार कमी लोकांना जमतं.

रूपांतर मध्ये ताई म्हणतातच की, मी बुद्ध धम्म स्वीकारल्यावर मला मनातून एक प्रकारच्या मुक्ततेचा आणि योग्य निर्णय घेतल्याच्या समाधानाचा अनुभव येत होता.

बौद्ध धम्म स्वीकार हा माझ्या तोपर्यंतच्या सार्वजनिक चळवळीचेच ते परिवर्तन आहे असं त्या म्हणतात. पुढे त्या असे म्हणतात की ज्या ज्या वेळी मला एकटं वाटतं त्या त्यावेळी बुद्धाचं स्मितहास्य मला दिलासा देतं आणि बुद्ध म्हणतो तूच तुझा दीप बनू शकतेस. कशाला दुसऱ्यांकडून अपेक्षा ठेवतेस?

बुद्ध विषयक आकलनातील सर्वात महत्त्वपूर्ण भाग हा आहे, तो त्यांच्या उपदेशातून आपल्याला मिळणारा मानसिक आधार. त्या काळातल्या रूपाताई मी फार जवळून बघितलेल्या आहे.

रूपांतर हे एक प्रकारे रूपाताई यांचे चरित्र तर आहेच पण ते विदर्भातल्या चळवळीचे चरित्र जास्त आहे. कारण रूपाताई संस्कृतच्या प्राध्यापिका जरी होत्या तरी त्या प्राध्यापकी आयुष्य कधीच जगल्या नाहीत. त्या जगल्या चळवळी सोबत. म्हणूनच म्हणते की हा गेल्या ४० वर्षांचा विदर्भाच्या चळवळीचा लेखाजोखा आहे.

रूपाताईंसारखी माणसं फक्त कामासाठीच जगत असतात. आपल्या स्वतःच्या आयुष्यापलीकडे बघून लोकांसाठी जगणारी माणसं फार कमी असतात. हा इतरांसाठीचा प्रेमाचा ओलावा कायम ताईंच्या मनात आहे. त्यांच्या कार्याला सलाम आणि त्यांच्या दीर्घ सुदृढ आयुरारोग्यासाठी शुभेच्छा.

■ ■ ■

# डाव्या विचारसरणीची बुलंद तोफ थंडावली



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५३४६२९५

डाव्या विचासरणीचा बुलंद आवाज असे ज्यांचे वर्णन केले जाते ते कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी खासदार सीताराम येचुरी यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने डाव्या विचारसरणीची बुलंद तोफ थंडावली.

१२ ऑगस्ट १९५२ रोजी जन्मलेले सीताराम येचुरी हे भारतीय राजकारणातील प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. विद्यार्थी दशेतच ते कम्युनिस्ट पक्षाकडे आकर्षित झाले. आपले शालेय व महाविद्यालयीन शिक्षण हैद्राबाद येथे पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी त्यांनी दिल्ली गाठली.

दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्राची पदवी मिळवली. तिथेच ते स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियात सक्रिय झाले. या संघटनेचे ते तीन वेळा महासचिव बनले.

पुढे त्यांना या संघटनेचे अध्यक्षपद मिळाले. त्यानंतर ते कम्युनिस्ट पक्षात सक्रिय झाले. कम्युनिस्ट पक्षात त्यांनी विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी अनेक आंदोलने केली. त्यांनी केलेल्या आंदोलनाची दखल सरकारला घ्यावी लागली. त्यांच्या या कार्यामुळे कम्युनिस्ट पक्षाने त्यांना केंद्रीय सचिव पदावर काम करण्याची संधी दिली.

१९९२ साली चेन्नई येथे झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या १४ व्या काँग्रेसमध्ये त्यांची पक्षाच्या पॉलिट ब्युरो सदस्य म्हणून निवड करण्यात आली. कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिट ब्यूरो सदस्य म्हणून त्यांनी भारतात कम्युनिस्ट पक्ष वाढवण्याचे मोठे कार्य केले. गावागावात, घराघरात कम्युनिस्ट पक्ष नेण्याचे प्रयत्न त्यांनी केला.

त्यांच्या या प्रयत्नांना पश्चिम बंगाल, केरळ आणि त्रिपुरा या राज्यात मोठे यश मिळाले.

या राज्यात कम्युनिस्ट पक्षाची सरकारे आली. संसदेतही कम्युनिस्ट पक्षाचे अनेक खासदार निवडून आले. सीताराम येचुरी हे स्वतः संसदेत निवडून गेले. संसदेतही त्यांनी विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडले. आपल्या बुलंद आवाजाने आणि अभ्यासपूर्ण भाषणाने त्यांनी संसद दणाणून सोडली.

सीताराम येचुरी यांच्यावर पक्षाने अनेक जबाबदाऱ्या सोपविल्या त्या त्यांनी लिलिया पेलल्या. त्यांनी पक्षाच्या आंतरराष्ट्रीय विभागाचे अध्यक्षपद सांभाळले.

पक्षाचे मुखपत्र असलेल्या पीपल्स डेमॉक्रासी या नियतकालिकाचे संपादक पदही त्यांनी भूषवले. महाराष्ट्राचे प्रभारी पद ही त्यांनी सांभाळले. त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. त्यांच्या निधनाने केवळ डाव्या विचरसरणीचीच नव्हे तर देशाची मोठी हानी झाली आहे.

त्यांच्या निधनाने विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकरी यांच्या हितासाठी आयुष्यभर झटणारा एक विचारवंत, तत्वनिष्ठ नेता देशाने गमवला आहे. त्यांची पक्षनिष्ठा आणि पक्षाच्या विचाराशी असलेली बांधिलकी हा राजकारणाचा क्षेत्रात आदर्श ठरणार आहे.

राजकीय भुमिकांबाबत मतभिन्नता असूनही मनभेद असू नयेत अशी निखळ मानवतावादी वृत्ती जपणारे ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉम्रेड सीताराम येचुरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली! कॉम्रेड सीताराम येचुरी यांना अखेरचा लाल सलाम !!

■ ■ ■

## वाचक लिहितात

### गणेश मूर्तींमुळेच जलप्रदूषण होते का?

नदीपात्रात किंवा समुद्रात श्री गणेश मूर्तींचे विसर्जन केल्यामुळे जलप्रदूषण होत असल्याचा कांगावा काही तथाकथित पर्यावरणप्रेमींकडून केवळ गणेशोत्सवाच्या काळातच केला जातो आणि त्यासाठी मूर्तीदान करण्याचे किंवा मूर्तींचे कृत्रिम हौदात विसर्जन करण्याचे आवाहन गणेशभक्तांना केले जाते.

श्री गणेशमूर्तीचे विसर्जन वाहत्या पाण्यात किंवा नैसर्गिक स्त्रोत असलेल्या ठिकाणी करावे असा धर्मशास्त्रीय सिद्धांत असून त्यामागील शास्त्रीय कारणही तितकेच महत्वाचे आहे. गणेशोत्सव काळात किती जलप्रदूषण होते याचे कोणतेही परीक्षण आजतागायत करण्यात आलेले नाही किंवा तसा अहवालही कुठे सादर करण्यात आलेला नाही, मग ही नुसतीच आधारहीन बोंब दरवर्षी कशासाठी?

यंदा दीड आणि ५ दिवसांच्या गणेशमूर्ती विसर्जनाच्या वेळी अनेक नद्यांच्या आणि नैसर्गिक तळ्यांच्या ठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. हे पोलीस गणेशभक्तांना नद्यांमध्ये आणि तळ्यांमध्ये मूर्ती विसर्जन करू देत नव्हते. अशा प्रकारे गणेशभक्तांवर बळाचा वापर करून त्यांना वाहत्या पाण्यात मूर्तीविसर्जन करण्यास मज्जाव करायचा आणि 'यंदा गणेश भक्तांची कृत्रिम हौदांना पसंती' अशा मथळ्याच्या बातम्या प्रसारित करायच्या हा कुठला न्याय आहे? नद्या आणि समुद्रामध्ये कारखान्यांचे रसायनमिश्रित पाणी आणि सांडपाणी प्रतिदिन मोठ्या प्रमाणात सोडले जाते याविषयी पर्यावरणप्रेमी वर्षभर काहीच बोलताना आढळत नाहीत.

कत्तलखान्यातील रक्त मिश्रित पाणी आणि प्राण्यांचे अवयव नद्यांमध्ये सोडले जातात याकडेही ही मंडळी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. त्यामुळे पर्यावरण प्रेमाचे डोस केवळ गणेशभक्तांनाच पाजण्याऐवजी वर्षभर पाणी प्रदूषित करणाऱ्या मंडळींना आणि त्यांना अनिर्बंध सोडणाऱ्या प्रशासनालाही पाजावेत जेणेकरून खऱ्या अर्थाने पर्यावरणाचे रक्षण होईल.

■ सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी.

### निव्वळ धांगडधिंगा...

लाडक्या बाप्पाचा गणेशोत्सव सुरू होवून पाच दिवस झालेत. नागपूर शहर आणि लगतच्या ग्रामिण भागात शेकडोच्या संख्येने गणेश मंडळांकडून हा उत्सव साजरा केला जात आहे. तथापि, मोजकेच मंडळ काही विधायक उपक्रम राबवित असून, बहुतेक मंडळांकडून नुसता धांगडधिंगा सुरू आहे. लावण्या, आर्केस्ट्रा, त्यातील नृत्यावर थिरकणे हे सर्व बाजूलाच बसलेले बाप्पा बघत आहेत. या सर्वावर कहर म्हणजे नागपूर शहराच्या मध्यवर्ती भागातील एका शासकीय कार्यालयातील उत्सव. कार्यालयात परिसरातच तळमजल्यावरील पार्किंगमध्ये बाप्पाची स्थापना करण्यात आली असून, दररोज आर्केस्ट्रा साजरा होत आहे. त्यात, याच कार्यालयातील अनेक किशोर कुमार, मो. रफी, मुकेश, कुमार सानू गीत सादर करतात. ठीक आहे, सुप्त गुणांना वाव मिळतो आहे. पण, संतापजनक म्हणजे एकीकडे आर्केस्ट्रा सुरू असताना काही अधिकारी, कर्मचारी पडद्यामागे मनसोक्त ढोसताना दिसतात. या कार्यालयाचा ज्यांच्याशी संबंध येतो ते व्यावसायीक, दुकानदारही झूम बराबर झूम मध्ये सहभागी होतात. गणेशोत्सवाच्या नावाखाली हे असे विभत्स रूप आहे.

■ विनोद नवखरे
नागपूर.




# पोटात गॅस का निर्माण होतो?

पोटात गॅस निर्माण होण्याची अनेक कारणे असू शकतात. अपचनामुळे जड वस्तू खाल्ल्याने गॅस तयार होतो.

कधी कधी जड प्रोटीन आणि जड अन्न खाल्ल्यानेही पोटात गॅस तयार होतो. गॅस बाहेर पडत असेल तर पोटात तितकेसे दुखत नाही, पण गॅस अडकून बाहेर पडत नसेल तर दुखणे, पोट फुगणे अशा समस्या उद्भवतात. अशा वेळी काही घरगुती उपाय करून आपण या गॅसपासून मुक्ती मिळवू शकतो.

**कोमट पाणी प्या :** गॅसपासून मुक्त होण्यासाठी कोमट पाणी प्या. हे गॅस पास करण्यास अनुमती देईल आणि आराम देईल. युरोपियन जर्नल ऑफ फार्मास्युटिकल अँड मेडिकल रिसर्चमधील एका अभ्यासानुसार, नियमितपणे आणि विशेषतः सकाळी कोमट पाणी प्यायल्याने पचनसंस्थेला योग्य प्रकारे काम करण्यास मदत होते. यामुळे बद्धकोष्ठता, गॅस किंवा इतर कोणत्याही समस्येपासून आराम मिळू शकतो.

गॅसमुळे पोट फुगण्याची समस्या सामान्य आहे. कधी कधी आंबट ढेकरही येतात. अशा स्थितीत कोमट पाण्यात लिंबाचा रस घालून पिऊ शकता. किंवा अर्धा चमचा जिरे पाण्यात उकळून ते पिऊ शकता. गॅसमध्ये आराम मिळेल.

**सेलेरी खा :** सेलेरी प्रत्येक स्वयंपाकघरात आढळते. फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि खनिजे भरपूर असल्याने ते पौष्टिक आहे. हे पारंपारिक भारतीय वैद्यकीय पद्धतींमध्ये ब?्याच काळापासून वापरले जात आहे.

गॅस तयार झाल्यास किंवा पोट फुगल्याच्या बाबतीत, काही सेलेरी रॉक सॉल्टमध्ये मिसळून चघळा आणि नंतर कोमट पाणी प्या. गॅसपासून आराम मिळेल.

**एका जातीची बडीशेप खा :** बडीशेपमध्ये अँटी-मायक्रोबियल गुणधर्म असतात, जे पोटात गॅस, जळजळ, वेदना आणि पोट फुगणे या समस्यांपासून आराम देतात. याचे सेवन केल्याने तुम्हाला गॅसपासूनही आराम मिळेल.

**दही खा :** पचनसंस्था निरोगी ठेवण्यासाठी दही खूप फायदेशीर आहे. हे पचनासाठी उपयुक्त आहे. पोटात गॅस होत असेल तर दही खावे. हे ताक किंवा लस्सीच्या स्वरूपातही घेता येते.

काळी मिरी आणि वाळलेले आले जेवल्यानंतर एक तासाने अर्धा ग्लास पाण्यात 1 चमचा काळी मिरी पावडर आणि 1 चमचा आले पावडर मिसळून प्या. आले हिंग आणि खडे मीठ मिसळून प्यायल्याने गॅसपासून आराम मिळतो.

**केळी खा :** केळ्यामध्ये लोह आणि पोटॅशियम असते. हे पोटात जळजळ आणि सूज कमी करण्यास मदत करते. पोट फुगण्याची किंवा गॅसची समस्याही दूर करते. सकाळी नाश्त्यासोबत घेणे चांगले.

■ ■ ■

## अशोकायन

### माफी कसली मागता?

केवळ माफी मागून प्रकरण
कसं होईल स्टॉप?
शिवबांनीच उघडकीस आणलं
कमीशन राजचं पाप ..

दोषींना उभारायला लावा
पुतळा स्वखर्चाने
तरच जनता समजेल
तुम्ही लिपींत नाही एका
रुपयाने..

समित्या स्थापन करून
करू नका टाईमपास
आधी हे सांगा
पुतळ्याचे आयुष्य
किती असावे हमखास ..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# नागपूर येथे जना स्मॉल फायनान्स बँकेच्या नव्या शाखेचे उद्घाटन

**नागपूर, सप्टेंबर २०२४ :** जना स्मॉल फायनान्स बँक, या भारतातील सर्वात मोठ्या स्मॉल फायनान्स बँकेने नागपूर, महाराष्ट्र येथे नवी शाखा सुरू केलीआहे. या शाखेच्या उद्घाटनाने जना स्मॉल फायनान्स बँकेच्या प्रवासात महत्त्वाचा टप्पा पार करत बँकेच्या शाखांची संख्या ७७६ झाली आहे. महाराष्ट्र राज्य शाखांच्या नेटवर्कमध्ये चौथ्या क्रमांकावर असून शाखांची संख्या ८४ आहे. नवी शाखा बँकेच्या विस्तार योजनेचा भाग असून त्याद्वारे कंपनीने आपल्या सेवा देशभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

नागपूर, महाराष्ट्रातील नवी शाखा विविध प्रकारच्या बँकिंग सेवा आणि उत्पादने पुरवणार असून त्यात बचत खाती, निश्चित ठेवी, कर्ज आणि विम्याचा समावेश आहे. शाखेद्वारे डिजिटल बँकिंग सेवाही दिल्या



जाणार असून त्यात बँकिंग व इंटरनेट बँकिंग सेवांचाही समावेश असेल.

नागपूर शाखेच्या उद्घाटनानंतर जना स्मॉल फायनान्स बँकेच्या शाखांची संख्या वर गेली असून महाराष्ट्र ८४ शाखांच्या नेटवर्कसह चौथ्या क्रमांकावर आहे. १२ सप्टेंबर रोजी माननीय श्री. नितिन जी गडकरी, केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्या हस्ते या शाखेचे उद्घाटन करण्यात आले.

माननीय श्री विनायक महामुनी, आईएएस, मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपुर जिला परिषद ,माननीय श्री कृष्णा पी खोपडे, आमदार, श्री. चंद्रशेखर गलगलीकर, आर्ट ऑफ लिव्हिंग श्री. रवी कासखेड़िकर, श्री दयाशंकर चंद्रशेखर तिवारी, पूर्व मेयर नागपुर, आणि श्री अजय बोधारे, पूर्व सभापति, पंचायत समिति, कांपटी हे मान्यवर उद्घाटनप्रसंगी नागपूर, महाराष्ट्र येथे उपस्थित होते. जना स्मॉल फायनान्स बँकचे

**नागपूरमधील शाखेच्या उद्घाटनानंतर बँकेच्या शाखांची संख्या ७७६ वर, बँकिंग सेवा सहज उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध**

व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजय कंवल म्हणाले, माननीय श्री नितिन जी गडकरी यांच्या उपस्थितीत झालेल्या उद्घाटनाने आम्ही भारावून गेलो आहोत. माझ्यासाठी तसेच देशपातळीवरील आमच्या २२,००० कर्मचाऱ्यांसाठी हे प्रेरणादायी आहे. या लाँचमुळे महाराष्ट्रासारख्या आमच्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या राज्यातील बँकेचे अस्तित्व आणखी मजबूत झाले आहे. ही शाखा व तेथील फिजिटल सेवांच्या माध्यमातून नव्या भारताच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. जना स्मॉल फायनान्स बँकेच्या २४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांत शाखा आहेत. त्यापैकी २६१ शाखा म्हणजेच ३३.६ टक्के व्यवसाय अनबँक्ड रूरल केंद्र (युबीआर) आहेत.

# व्हीं जॉन इंडियातर्फे शेविंग क्रीम आणि फोमने बनविलेल्या आशियातील पहिल्या ८ फुटी गणपतीचे अनावरण

**मुंबई, १४ सप्टेंबर २०२४** सर्जनशीलता, परंपरा आणि नावीन्याचा अनोखा मेळ घालत, व्हीं जॉन इंडिया या पुरुषांसाठीच्या ग्रुमिंग क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने ८ फुटी गणपतीच्या आकर्षक मूर्तीचे अनावरण केले असून, ही मूर्ती पूर्णपणे शेविंग क्रीम आणि फोम वापरून बनविण्यात आली आहे. पुण्यातील ग्रँड स्ट्रीट मॉल येथे 'व्हीं जॉन गणपती' नावाने ही मूर्ती बसविण्यात आली आहे. या मूर्तीला एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये शेविंग क्रीम आणि फोमपासून बनविलेल्या सर्वात मोठ्या गणपतीचे अधिकृत स्थान मिळाले आहे. दैनंदिन जीवनातील ग्रुमिंगचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या व्हीं जॉन इंडियाच्या प्रयत्नांतून ही सर्जनशील मूर्ती साकारण्यात आली आहे. हुशारी, नवा आरंभ आणि यशाचे प्रतीक असलेल्या गणरायाची निवड करत व्हीं जॉन ब्रँडने सेल्फ केयर व ग्रुमिंगचे महत्त्व कल्पकतेने इतरांपर्यंत पोहोचविले आहे. हा अशा प्रकारचा पहिलाच गणपती साकारण्यासाठी शेविंग क्रीम आणि फोमचे , युनिट्स वापरण्यात आले असून, दिवसांच्या अथक मेहनतीतून मूर्ती तयार करण्यात आली आहे. ही मूर्ती नेत्रदीपक आमि शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना असून, ग्रुमिंग आणि सेल्फ-केयही ब्रँडची तत्त्वे ठळकपणे अधोरेखित करणारी आहे. याप्रसंगी व्हीं जॉन इंडियाचे विपणन व्यवस्थापक आशुतोष चौधरी म्हणाले, गणेश चतुर्थी हा भक्तीचा, नवी सुरुवात करण्याचा आणि उत्सवाचा काळ असतो. ज्याप्रकारे गणपती बाप्पांना आपल्या हृदयात महत्त्वाचे स्थान आहे, त्याप्रमाणे पर्सनल केयरलाही



आयुष्यात महत्त्वाचे स्थान असायला हवे. हे आम्हाला अधोरेखित करायचे होते. व्हीं जॉन गणपतीच्या माध्यमातून आम्ही परंपरा जपत ग्रुमिंगचे महत्त्व कल्पकतेनं

# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत अश्विनला अटक

सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेतील पुष्पा (करुणा पांडे) या एका धडाडीच्या आणि जीवनाचा जिद्दीने आणि आशावादाने सामना करणाऱ्या स्त्रीच्या कथेने प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की स्वाभिमानाच्या समस्येवर मात करून राशी (देशना दुगड)ने एक अॅड प्रोजेक्ट मिळवल्यानंतर पुष्पाच्या परिवारात आनंदीआनंद झाला आहे. आगामी भागांमध्ये, राशी ऑनलाइन ट्रोलिंगचे लक्ष्य बनते. किंग ऑफ कूल नावाने ट्रोलिंग करणारा हा इसम प्रभास (भव्य गांधी) आहे.



अश्विनला जेव्हा समजते की त्याच्या बहिणीला अशा पद्धतीने त्रास दिला जात आहे, तेव्हा तो प्रभासशी आमनासामना करतो. त्यावेळी त्याला ही कल्पना नसते की एका मनोरुग्ण आणि अस्थिर व्यक्तीशी त्याचा सामना झाला आहे आणि तो प्रभासला थोबाडित मारतो. यामुळे प्रभास बिथरतो आणि अश्विनला धमकी देतो. सूड उगवण्यासाठी आपल्या मित्रांच्या साथीने प्रभास अश्विनच्या गाड्यांचे नुकसान करतो आणि एका गाडीत पिस्तुल लपवून ठेवतो. नेमके त्याच वेळी, अश्विनचा व्यवसायाचा परवाना रद्द करण्यात येतो. त्यामुळे अश्विनचे भविष्य अनिश्चित होऊन जाते. हे दुष्टचक्र इथेच थांबत नाही, तर प्रभासच्या कृत्यामुळे अश्विन तुरुंगात जातो त्यामुळे पुष्पाचा परिवार गोंधळून जातो आणि दुःखी कष्टी होतो. पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत अश्विनची भूमिका करणारा अभिनेता नवीन पंडिता म्हणतो, अश्विन प्रभासला धडा शिकवायला जातो पण त्याचे भयंकर परिणाम त्याला भोगावे लागतात. प्रभासची सामना झाल्यानंतर एक भयंकर दुष्टचक्र त्याच्या आयुष्यात सुरू होते आणि त्याचे जीवन उद्ध्वस्त होते. त्याचा व्यवसायाचा परवाना रद्द होतो आणि त्याला अटक होऊन तो तुरुंगात जातो. या घटनांचा अश्विनच्या

# सचेत टंडनने दिली आपली गिटार सा रे ग म प मधील एका स्पर्धकाला भेट

**मुंबई, १४ सप्टेंबर :** झी टीव्हीवरील सा रे ग म प आपल्या नवीनतम पर्वासह आणि सचिन - जिगर, सचेत -परंपरा आणि गुरू रंधावा ह्या मेंटॉर्सच्या नवीन पॅनलसह भारतातील काही सर्वोत्तम भावी आवाज घेऊन येत असून नयी आवाज, नया अंदाज हे ह्या शो चे वचन आहे. काही गुणी स्पर्धकांसोबत सा रे ग म प च्या ह्या नवीन पर्वामध्ये लोकप्रिय संगीतकार जोडी आणि गुज्जू ब्रदर्स सचिनजिगर हे रिलिटी टीव्हीवर पदार्पण करत असून त्यांच्यासोबत डायनॅमिक संगीतकार आणि गीतकार जोडी सचेतपरंपरा आणि लोकप्रिय संगीतकार, गायक आणि गीतकार गुरू रंधावा तर विपुल रॉय ह्या पर्वाच्या सूत्रसंचालकाच्या रूपात दिसून येणार आहे. देशभरातील स्पर्धक सर्वोच्च १२ मध्ये आपले



स्थान मिळवण्यासाठी तयारी करत असून त्यातील काहीच जण प्रीमिअरच्या भागामध्ये परीक्षकांना आपल्या खास आवाज आणि संगीतावरील प्रेमासह प्रभावित करू शकले आहेत. अशीच एक स्पर्धक आहे श्रद्धा मिश्रा, जिने ओमकारा चित्रपटातील बीडी हे गीत सादर केले आणि सर्वांचे मन जिंकले. पण तिचा परफॉर्मन्स सचेत टंडनला सर्वाधिक आवडला आणि त्याने तिला एक खास भेट देण्याचे ठरवले. आपले सुंदर गीत बेखयालीसह सचेतने प्रेक्षकांचे मन जिंकले होते, त्याने त्याच गाण्याच्या रेकॉर्डिंगसाठी वापरण्यात आलेली गिटार श्रद्धाला भेट दिली आणि पुढच्या परफॉर्मन्समध्ये तिला ती वापरण्याची विनंती केली.

# सॅमसंगकडून गॅलॅक्सीक एस अल्ट्रावर आकर्षक लिमिटेड पीरियड ऑफरची घोषणा

**आता भारतात १,०९,९९९ रूपयांपासून उपलब्ध**

**गुरूग्राम, भारत -१४ सप्टेंबर , -** सॅमसंग या भारतातील ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने त्यां चा प्रमुख गॅलॅक्सीम एस अल्ट्राट स्माउर्टफोनवर अभूतपूर्व किमतीची घोषणा केली आहे. सप्टेंबर पासून गॅलॅक्सीम एस अल्ट्राव लिमिटेड पीरियड ऑफरचा भाग म्हूून फक्त ,, रूपयांमध्येट उपलब्ध असेल. या स्मार्बटफोनची मूळ किंमत ,, रूपये होती. स्पेतशल किमतीमध्येर , रूपयांची त्वरित कॅशबॅक, तसेच , रूपयांच्याम अतिरिक्तड अपग्रेड बोनसचा समावेश आहे. याव्यकतिरिक्तय, ग्राहक , रूपयांच्यास बँक कॅशबॅकचा देखील आनंद घेऊ शकतात. तसेच, अधिक परवडणाऱ्या स्मार्टफोनचा शोध घेत



असलेले ग्राहक महिन्यां साठी नो-कॉस्टि ईएमआयचा फायदा घेऊ शकतात. गॅलॅक्सी एस अल्ट्रा् मोबाइल एआयच्या नवीन युगामध्येस प्रवेश करत आहे, ज्या.मुळे ग्राहक गॅलॅक्सीएआयसह अधिक टास्स्व करू शकतात. गॅलॅक्सी् एस अल्ट्रा् नेटिव्हस ॲपमध्येु फोन्सय कॉल्सहचे द्विमार्गी, रिअल-टाइम वॉईस व टेक्टुख भाषांतर देणाऱ्या लाइव्हस ट्रान्सालेटसह फोनची सर्वात मुलभूत भूमिका म्ह्जेच संवाद वाढवण्यालसोबत नव्या उंचीवर नेते. इंटरप्रीटरसह लाइव्ह संवाद त्वीरित स्प्लिट-स्क्रिन व्ह्यूवर भाषांतरित केले जाऊ शकतात. हे मेसेजेस आणि इतर ॲप्ससाठी सेल्युसलर डेटा किंवा वाय-फायशिवायदेखील कार्य करते. तसेच, चॅट असिस्टब संवादादरम्याान आवाज स्प्ष्टीपणे ऐकू येण्यारच्याा खात्रीसाठी परिपूर्ण संवादीय टोन्स. मिळण्या स मदत करू शकते. सॅमसंग कीबोर्डमध्येअ निर्माण करण्या्त आलेले एआय देखील रिअल-टाइममध्येत हिंदीसह भाषांमध्येम मेसेजेस भाषांतरित करू शकते. सॅमसंग नोट्समधील नोट असिस्टलसह वापरकर्त्यांमना एआय-जनरेटेड समरीज मिळतात आणि नोट्सना प्री-मेड फॉर्मेट्समध्यी समाविष्टआ करणारे टेम्प्लेम ट्स तयार करता येतात. अनेक स्पीतकर्स असताना देखील वॉईस रेकॉर्डिंग्सयसाठी ट्रान्स्क्रिप्ट असिस्ट रेकॉर्डिंगला थोडक्या त सांगण्याजसाठी आणि भाषांतरित करण्योसाठी एआय व स्पीरच-टू-टेक्ट्क्तंत्रज्ञानाचा वापर करते. गॅलॅक्सीज एस अल्ट्राणमध्यी गुगलसह 'सर्कल टू सर्च' वैशिष्ट्या देखील आहे. गॅलॅक्सी. एस अल्ट्राम्ध्येस प्रोव्हिज्यु अल इंजिन हे एआय-समर्थित्टूल्स्चे सर्वसमावेशक सूट आहे, जे फोटो कॅप्च्र करण्यासच्या् क्षमतेमध्येय परिवर्तन करते आणि सर्जनशीलता वाढवते. गॅलॅक्सी-एस अल्ट्रावमधील क्वॉ्ड टेलि सिस्ट्म नवीन ऑप्टिकल झूम लेन्सरसह येते, जी मेगापिक्सधल सेन्सटरसोबत काम करते आणि , , ते पर्यंतच्यार झूम लेव्हयल्ससमध्येश ऑप्टिकल-क्वॉकलिटी परफॉर्मन्सधची खात्री देते. याचे श्रेय ॲडप्टिव्हर पिक्ससल सेन्सरला जाते. सुधारित डिजिटल झूमसह फोटो मध्ये् अत्यंकत सुस्पीष्टस दिसतात. अपग्रेडेड नाइटोग्राफी क्षमतांसह गॅलॅक्सी एस अट्राच्या स्पेस झूमवर कॅप्चीर करण्यात आले. फोटो व व्हिडिओ कोणत्यारही स्थितींमध्ये , तसेच झूम केल्याटनंतर देखील आकर्षक व सुस्पिष्टर दिसतात. गॅलॅक्सीआ एस अल्ट्रोचा मोठा पिक्साल आकार आता . त्र असून टक्के मोठा आहे, ज्यागमुळे अंधुक प्रकाशात देखील सुस्परष्टोपणे फोटो कॅप्चीर करता येतात.

## चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

जावक क्रमांक :- चंशमनपा/बांध/कार्या-२/२०२४/२११४ दिनांक :- १२/०९/२०२४

**निविदा सूचना**

आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, जि. चंद्रपूर यांचे वतीने खालील कामासाठी बी १ दोन लिफाफा पध्दतीने निविदा पध्दतीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदाराकडुन निविदा मागविण्यांत येत आहे. वरील कामाची निविदा केवळ निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहे. सदर कामाचे अटी व शर्ती बांधकाम विभागामध्ये तसेच निविदा सोबत प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे वर्णन | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदे सोबत भरावयाची इसारा रक्कम | कोरे निविदा प्रपत्र किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | तुकूम प्रभागात दुर्गा मंदिर समोर पेव्हिंग ब्लॉक लावण्यांचे काम. | ७,९२,८४०/- | ७,९२८/- | ५९०/- | महिना |

निविदा प्रसिध्दीचा तपशील

| | |
|---|---|
| निविदा विक्री दिनांक | दिनांक १२/९/२०२४ ते २४/९/२०२४ ला १२:०० वाजेपर्यत |
| निविदा सादर करावयाची दिनांक | दिनांक २५/९/२०२४ ला ५:०० वाजेपर्यंत. |
| निविदा उघडणी दिनांक | दिनांक २६/९/२०२४ ला १२.० वाजता शक्य झाल्यास. |

स्वा /-
आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूर

# आजचे राशिभविष्य

**मेष:** काही विरोधक किंवा गुप्त शत्रू तुमच्या योजना यशस्वी करण्याचा प्रयत्न करतील.कामात बोलण्यावर नियंत्रण ठेवा. अन्यथा व्यर्थ वाद होऊ शकतो. वडिलोपार्जित संपत्तीबाबत वाद संभवतो .

**वृषभ :** व्यवसायाच्या क्षेत्रात गुंतलेल्या लोकांची व्यवसायात प्रगती होईल. नोकरीत बदली होण्याची शक्यता आहे. विरोधक राजकारणात सक्रिय होऊ शकतात.

**मिथुन :** कामाच्या ठिकाणी खूप धावपळ होईल. कार्यक्षेत्रात अति व्यस्तता वाढू शकते. बदली होण्याची शक्यता आहे. व्यवसायात भविष्यात फायदेशीर संकेत मिळतील. तुमच्या योजना उघड करू नका.

**कर्क :** नोकरीत उच्च अधिका-यांशिवळीक वाढेल. व्यवसायात वडिलांचे सहकार्य आणि सहकार्य मिळेल. दूरच्या देशातून प्रिय व्यक्तीची बातमी मिळेल. व्यवसायात वेळेवर काम करा. नक्कीच यश मिळेल.

**सिंह :** विरोधकांच्या कारवायांवर बारीक नजर ठेवावी. नोकरदार वगार्ला रोजगार मिळेल. तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागेल. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत नोकरदारांचा आनंद वाढेल.

**कन्या :** कार्यक्षेत्रात संयम ठेवा. विशेषत: सहकार्यासह सामान्य समन्वयाची आवश्यकता असेल. विरोधकांशी जास्त वाद वगैरे टाळा. विरोधकांपासून सावध राहा, काम पूर्ण होईपर्यंत चर्चा करू नका.

**तुळ :** कामात अडथळे येतील. परिस्थिती काहीशी अनुकूल होऊ लागेल. तुमच्या भावनांना योग्य दिशा द्या. नातेवाईकांशी परस्पर मतभेद होऊ शकतात. धार्मिक कार्यात रुची वाढेल.

**वृश्चिक :** कामाच्या ठिकाणी कठोर परिश्रम करूनही तुम्हाला योग्य परिणाम मिळणार नाहीत. सहका?यांशी मतभेद होऊ शकतात. कोणाचीही दिशाभूल करू नका.

**धनु :** अतिरिक्त परिश्रमाने परिस्थिती सुधारेल. काम करणाऱ्या लोकांच्या वैयक्तिक अडचणी वाढू शकतात. नोकरीत तुमच्या कामाकडे अधिक लक्ष देण्याची गरज भासेल.

**मकर :** कौटुंबिक समस्यांचा कामावर परिणाम होऊ शकतात. तुमच्या औद्योगिक व्यवसायात विस्तार करण्याची तुमची इच्छा पूर्ण होईल. तुम्हाला काही चांगली बातमी मिळेल.

**कुंभ :** नोकरीत वरिष्ठांचा आदर करा. कार्यक्षेत्रात संयम आणि संयमाने आपले काम करा. सामाजिक कार्यात संयमाने वागा. विरोधी पक्ष तुमचा अपमान करण्याचा प्रयत्न करू शकतो.

**मीन :** जमीन विक्रीमध्ये गुंतलेल्या लोकांना कठोर परिश्रमानंतर चांगले यश मिळेल. नवीन उद्योग लवकरच सुरू होऊ शकतात. कोणतेही अपूर्ण काम पूर्ण केल्याने तुमचे धैर्य आणि मनोबल वाढेल.

# सोनी सबवरील श्रीमद् रामायण मालिकेत राम आणि सीतेचे अपार बलिदान त्यांना एकमेकांपासून दूर करणार

**मुंबई, १४ सप्टेंबर :** सोनी सबवरील श्रीमद् रामायण मालिकेत श्रीराम (सुजय रेऊ) आणि सीता (प्राची बंसल) यांची दिव्य कथा विशद केली आहे. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की सहस्रमुख रावणाने (प्रणीत भट) अयोध्येच्या नगरजनांमध्ये लंकेहून परत आलेल्या सीतेच्या पावित्र्याविषयी कसा संदेह निर्माण केला. आगामी भागांमध्ये, प्रेक्षक बघतील की, राम आणि सीता यांना सीता गरोदर असल्याचे समजते. पण सीतेच्या चारित्र्याविषयी प्रजेच्या शंका कुशंकांमुळे ते चिंतेत पडले आहेत. अखेरीस हे दैवी पती-पत्नी परस्पर सहमतीने एक कठोर निर्णय घेतात आणि असे ठरवतात की, सीता वाल्मिकी आश्रमात जाऊन राहील. राम आणि सीता दोघांचे यावर एकमत होते की,




त्यांच्या मुलांच्या संगोपनासाठी आसपासचे वातावरण सात्त्विक असणे आवश्यक आहे. त्यामुळे ते दोघे मिळून हा निर्णय घेतात की, ते अलग होऊन आपल्या मुलांना वाढवतील. श्रीमद् रामायणमध्ये श्रीरामाची भूमिका करणारा सुजय रेऊ म्हणतो, हे बघताना खूप त्रास होतो की, अत्यंत पवित्र असलेल्या सीतेचे केवळ रावणाने अपहरण केल्यामुळे तिच्या चारित्र्याबद्दल शंका घेतली जाते. याचा परिणाम म्हणून राम आणि सीता यांना एकमेकांपासून अलग व्हावे लागते. हा एक आगळा वेगळा दृष्टिकोन आहे, जो फारसा ऐकीवात नाही. श्रीमद् रामायणमध्ये सीतेची भूमिका करणारी प्राची बंसल म्हणते, या दृश्याचे शूटिंग करताना मी खूप भावुक झाले होते. अत्यंत पवित्र आणि कणखर मनाच्या सीतेवर समाजाने सहज आरोप करून टाकला. हे बघताना वाईट वाटते की, स्त्रीच्या चारित्र्यावर संशय घेणे किती सोपे आहे! खरं म्हणजे या साऱ्या प्रकारात तिची काहीच चूक नाही आहे.

बघत रहा सोनी सबवर श्रीमद् रामायण दर



## शनिवार १४ सप्टेंबर २०२४

### खुल जा सीम सीम
### जबरदस्त पास होणारे चांसेस

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| २३५ | ५६० | २३९ | २६९ | १५७ | २३० | १७८ | १८० |
| ३७० | ४७० | ५९० | ४५८ | २२९ | ३५७ | ३५८ | ३७९ |
| ४६० | ३८० | ६८० | ३६८ | ३३७ | १२२ | २४० | २७० |
| ०२ | १२ | ४६ | ७६ | ३२ | ५२ | ६८ | ९८ |
| ०५ | १५ | ४९ | ७९ | ३४ | ५४ | ६१ | ९१ |
| ०८ | १८ | ४३ | ७३ | ३० | ५० | ६७ | ९७ |


सर्व बाजारसाठी

३९, ३१, ३३ (१३९ २३८ ३३७)
६९, ६१, ६३ (२४० ३३० ४५७)
७२, ७४, ७८ (४६७ २२३ ३४०)
०२, ०८, ०४ (६७७ २४४ ४७९)

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**


## वंशज मालिकेत नीलच्या रहस्यमय मृत्यूचे कोडे युविका लवकरच सोडवणार

**मुंबई, १४ सप्टेंबर :** एका पुरुषप्रधान व्यावसायिक कुटुंबातील मुलगा आणि मुलगी यांच्या भूमिका आणि वारशाशी निगडीत संघर्ष दाखवून सोनी सबवरील वंशज



मालिकेने प्रेक्षकांना गुंतवून ठेवले आहे. सध्या तलवार आणि महाजन यांच्यातील वर्चस्व सिद्ध करण्याची लढाई पेटली आहे. या दोन कुटुंबांमधील पराकोटीचे वैर पाहताना प्रेक्षकांची उत्कंठा वाढली आहे. अलीकडच्या भागांमध्ये, अक्षत (साहिब सिंह)ने ईशा महाजन (कंचन दुबे)ला आपण तलवार कुटुंबातील सदस्य असल्याचे सांगितल्याने तलवार आणि महाजन पुन्हा आमने-सामनेआले आहेत. तलवार आणि महाजन यांच्यातील शत्रुत्व पराकोटीला पोहोचले आहे आणि याच सुमारास युविका आपला प्रियकर नील (मोहित कुमार) याच्या रहस्यमय मृत्यूचे सत्य उघडकीस आणण्याच्या जवळ पोहोचली आहे.

## कार्यालय नगर परिषद भद्रावती, जिल्हा-चंद्रपूर

निविदा क्र. : - न.पं.भ/ बाधकाम/२०२४/६७३३ दिनांक :- १३/०९/२०२४.

Tel No. 07176-286662 (office)
07175-266025 (President)
Fax No 07175-265008
E-mail-mcphadrawat.@gmail.com
Web:-bhadrawatimc.org

**ई-निविदा सूचना**

**बांधकाम विभाग.**

मुख्याधिकारी नगर परिषद भद्रावती जिल्हा चंद्रपूर यांचे वतीने खालील कामाच्या बि - १ दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यांत येत आहे. वरील कामाची निविदा केवळ ई निविदा पद्धतीने सादर करावयाची आहे. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दिनांक १४/०९/२०२४ पासून पाहण्यास उपलब्ध आहे. कामाचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र | कामाचे नांव | कामाची एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण रस्ता अनुदान (सन २०२२-२०२३ व २०२३-२०२४) | ८ कामे |
| २ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना (सन २०२४-२०२५) | ११ कामे |
| | एकूण | १९ कामे |

ई -निविदा प्रसिध्दीचा तपशिल

| | |
|---|---|
| ओनलाईन ई निविदा विक्री व स्वीकृती दिनांक | दि. १४/०९/२०२४ ते २३/०९/२०२४ ला दु. ३:००वाजेपर्यंत |
| ओनलाईन निविदा उघडण्याचा दिनांक | दि. २४/०९/२०२४ ला शक्य झाल्यांस |

वर नमूद कामाच्या कामाच्या अटी, शर्ती, कामनिहाय अंदाजपत्रकीय किंमत, शेड्युल व इतर माहिती महाराष्ट्र शासनांच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईट वर) पहावयास उपलब्ध आहे. तसेच तद्धषगीक शुधीपत्रक शासनाच्या संकेतस्थळवर उपलब्ध करून देण्यात येईल.

(डॉ. विशाखा शेळकी)
मुख्याधिकारी तथा प्रशासक,
नगर परिषद भद्रावती

# विश्वकर्मा योजनेच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना धनादेश व साहित्याचे वाटप

### पंतप्रधानांचा दौरा आणि भाजप नेत्यांना पडला पेच

■ महासागर प्रतिनिधी,

**वर्धा, दि. १३ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २० सप्टेंबर रोजी वर्धा दौऱ्यावर आहेत. केंद्रीय सुक्ष्म व लघु मंत्रालयाच्या विश्वकर्मा योजनेच्या अनुषंगाने हा कार्यक्रम होत आहे. यावेळी योजनेतील लाभार्थ्यांना धनादेश व साहित्याचे वाटप होईल. तशी पाहणी खात्याचे केंद्रीय सचिव करून गेले. योजनेतील २० हजार लाभार्थी देशभरातून यात सहभागी होणार. तसेच प्रामुख्याने वर्धा जिल्ह्यातील कारागीर अधिक संख्येत राहणार असून त्यांच्यासाठी साडे सातशे बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.



**भाजप नेत्यांचे काय ?**

हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दौरा शासकीय योजनेसाठी राहणार. त्याची आखणी संबंधित मंत्रालयाने केली आहे. तसेच अन्य सोपस्कार पंतप्रधान कार्यालय करणार, हे स्पष्ट आहे. एनडीएचे पंतप्रधान असा उल्लेख आता होत असला तरी भाजप नेत्यांना ते आपले पंतप्रधान असल्याची भावना लपून नाही. म्हणून भाजप नेत्यांचे काय, असा पेच पक्षीय पातळीवर पडला. तो दूर करण्यासाठी आज जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, आमदार डॉ. पंकज भोयर व माजी खासदार रामदास तडस हे दुपारी उशीरा जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांची वेळ घेऊन भेटले. त्यावेळी सर्वप्रथम हा पूर्णतः सरकारी कार्यक्रम असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र पीएमओ सर्व काही ठरविणार. त्यांचेच निर्देश व्यासपीठावरील उपस्थिती, भाषणे, स्वागत, अती महत्वाचे व्यक्ती याबाबत चालणार.

सभेतील उपस्थिती बाबत जिल्हा प्रशासन सर्व ते अपेक्षित करणार, असे सांगण्यात आले. लोकप्रतिनिधी व गर्दीचे काय ? पंतप्रधान मोदी यांच्या स्टेजवर कोणाला स्थान मिळणार तसेच सभेतील गर्दी जमवण्याचे काय, असे प्रश्न पक्षीय पातळीवर उपस्थित करण्यात आले होते. तेव्हा आमदार, जिल्हाध्यक्ष अशांचे काय, या प्रश्नावर उत्तर निघालेले नाही. गर्दी प्रामुख्याने विश्वकर्मा लाभार्थी तसेच स्टार्ट अप उपक्रमातील युवा उद्योजक यांची राहणार. सध्या किमान ४० ते ५० हजार संख्येत उपस्थिती राहणार असल्याचे म्हटल्या जात आहे. जिल्हाध्यक्ष सुनील गफाट म्हणाले की आमच्या काही शंकाचे निरसन आम्हास करायचे होते. कार्यक्रम हा केंद्र शासन पुरस्कृत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यात आमच्या पक्षाची काहीच भूमिका राहणार नाही. पण व्हीआयपी पासेस तसेच पंतप्रधान मोदी यांचे स्वागत करण्याची संधी याबाबत पुढेच ठरेल. विभागीय आयुक्त उदया दौऱ्याच्या संदर्भात बैठक घेणार आहे. त्यावेळी कदाचित काही बाबींचा खुलासा होणे अपेक्षित आहे.

# प्रधानमंत्री आवास योजना प्रतीक्षा यादीत ग्रामसभेने दिलेल्यांना प्राधान्य देण्यात यावे

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सरपंच संघटनेने दिले निवेदन

■ महासागर प्रतिनिधी,

**आर्णी , दि. १३ :** प्रधानमंत्री आवास योजनेतील यादीमध्ये जे फरबद्दल केले आहेत, ते रद्द करून ग्रामपंचायतने दिलेल्या यादीनुसार यादी प्रविष्ठ करावी, अशा आशयाचे निवेदन आर्णी तालुक्यातील सरपंच संघटनेचे अध्यक्ष रवींद्र राठोड यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहे.



प्रधानमंत्री आवास योजनेसाठी ग्रामसभेमध्ये अपंग, विधवा, आत्महत्याग्रस्त, गरजू लाभार्थींना प्राधान्य देऊन निवड करून क्रमांक देण्यात आले होते. यादीतील क्रमांक बदलल्याने स्थानिक ग्रामपंचायतीतील लोकप्रतिनिधींबद्दल गावामध्ये नाराजी वाढली आहे. लोकप्रतिनिधींना ग्रामसभेने जे अधिकार दिलेले आहे, त्यानुसार या प्राधान्यक्रमामध्ये बदल करण्याची मागणी निवेदनात केली आहे. ग्रामपंचायतींची यादी बदलल्याचा आरोप ग्रामसभेने दिलेल्या प्राधान्यक्रमानुसारची यादी बदलली आहे, त्यांना पुन्हा ग्रामसभा घेऊन प्राधान्य देण्यासाठी आदेशित करावे. मूळ पहिली २०२३-२-२४मधील यादी ती पुन्हा कार्यान्वित करावी.

आर्णी तालुक्यात ३५ ते ४० ग्रामपंचायतींची यादी बदलली असून मागण्या मान्य होत नाही, तोपर्यंत लाभार्थ्यांचे प्रस्ताव पंचायत समिती कार्यालयात देणार नाही, असा इशारा यावेळी रवींद्र राठोड यांनी यावेळी दिला.

# क्षयरूग्णांना सहकार्यासाठी निक्षय मित्र

## अधिकाधिक व्यक्तींनी उपक्रमात सहभागी व्हावे-सीईओ बी. वैष्णवी

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. १३ :** सार्वजनिक आरोग्य विभागाकडून क्षयरूग्णांना सामाजिक सहकार्य होण्याच्या हेतूने जिल्ह्यात निक्षय मित्र जोडणी अभियान सुरू करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी या स्वतः निक्षय मित्र झाल्या असून, क्षयरूग्णांच्या सहकार्यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त व्यक्तींनी निक्षय मित्र व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. उपक्रमात नव्याने निक्षय मित्राची नोंदणी झाली आहे. त्यानुसार क्षयरुग्णांना पोषण आहार किट वितरित करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मनीष शर्मा यांनी दिली. केंद्र शासनाने सन पर्यंत टीबीमुक्त भारत निर्माण करण्याचे धोरण आखले आहे. क्षय रुग्णांना सामुदायिक सहाय्य मिळण्यासाठी आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाकडून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. निक्षयमित्र उपक्रमांद्वारे क्षयरुग्णांना अतिरिक्त सहाय्य मिळते. समाजातील कोणतीही व्यक्ती, सेवाभावी संस्था, व्यावसायिक संस्था, लोकप्रतिनिधी आदी सहभागी होऊन रुग्णांना मदत करू शकतात.




निक्षयमित्र होण्यासाठी वेबसाइट होईल नोंदणी निक्षय मित्र होण्यासाठी https://reports.nikshay.in/FormIO/DonorR egistration या लिंकवर जाऊन नोंदणी करावी लागेल किंवा जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मनीष शर्मा यांना ८४२१०८५३६८ मोबाईल क्रमांक वर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मुलाच्या मारेकऱ्यास तत्काळ अटक करण्याची मागणी करत आईचा टाहो

### जिल्हा पोलिस अधीक्षकांना ननावरे परिवाराचे निवेदन सादर

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. १३ :** आपल्या मुलाचा मारेकरी अद्यापही मोकाट असून वारंवार तक्रारीनंतर देखील त्याला अटक करण्यात आलेली नाही. सदर मारेकरी व अवैध सहकार योगेश भिकाजी सहभागी याला तत्काळ अटक करून न्याय द्यावा अशी मागणी मृताच्या आईने जिल्हा पोलिस अधीक्षकाकडे केली. यावेळी मृताच्या आई-वडिलांनीनिवेदन हे दिले. सदर निवेदन मेहकर येथे आयोजित शांतता समितीच्या बैठकीत ११ सप्टेंबर रोजी दिले.



या निवेदनात मृताच्या परिवाराने आरोप केला की, २७ मे रोजी रात्री दहा वाजेच्या दरम्यान येथील जानेफळ रोडवरील स्मशानभूमी मागे आपला मुलगा आकाश ननावरे यास व्याजाचे पैशासाठी आरोपीने दगड व काठीने ठेचून मारले. या घटनेनंतर आपण पोलिसांना तक्रार देण्यासाठी गेलो असता प्रथम मेहकर पोलिसांनी अवैध सावकार योगेश सौभाग्ये याच्या विरोधात तक्रार घेण्यास नकार दिला. त्यानंतर आपण उपविभागीय पोलीस अधिकारी मेहकर यांच्याकडे तक्रार केली असता उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश मेहकर पोलिस ठाण्यास दिले. परंतु मेहकर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षकांनी एफआयआर मधून मुख्य आरोपी योगेश भिकाजी सौभाग्ये याचे नाव वगळून इतर आरोपींवर गुन्हा दाखल करून उलट आम्हालाच दमदाटी करून तेथून हाकलून लावले. त्यानंतर न्याय मिळवण्यासाठी आम्ही तत्कालीन जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या बुलडाणा येथील कार्यालयासमोर १५ जून रोजी उपोषण केले. मुख्य अवैध सावकार योगेश सौभाग्ये याला अटक करण्याची मागणी केली. सदर उपोषण २८ जून पर्यंत करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या आश्वासनानंतर सदर उपोषण मागे घेतले. मात्र अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर देखील अद्यापही या प्रकारात कोणतीही कार्यवाही करण्यात आले नाही. सदर कारवाईसाठी आम्ही वारंवार मेहकर पोलिस स्टेशनमध्ये पाठपुरावा केला. परंतु मुख्य आरोपी योगेश अजूनही मोकाटच आहे.

तो सध्या आमच्या परिवाराला जीवे मारण्याच्या धमक्या देत असून माझे कोणीही काही वाकडे करू शकत नाही, हे प्रकरण संपल्यावर मी तुम्हाला बघून घेईल अशा धमक्या देतो, असा आरोप या निवेदनातून करण्यात आला आहे. याप्रकरणी लक्ष घालून आरोपीला तत्काळ अटक करावी व आमची शारीरिक मानसिक त्रासापासून मुक्तता करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# सेवा निवृत्त सैनिकांसाठी ईको बटालीयन मध्ये पद भरती

0 महासागर प्रतिनिधी,

**वर्धा, दि. १३ :** सेवानिवृत्त सैनिकांसाठी संभाजी नगर येथील

मराठवाडा ईको बलीयन १३६ टीए मिलीट्री छावणी येथे सामान्य ड्युटी, लिपीक

व इतर पदाकरीता भरती प्रक्रियेसाठी दि.२३ ते २८ सप्टेंबर या कालावधीत

रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीमध्ये माजी सैनिकांनी भाग घ्यावा,

असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी करण्यात आले आहे.

# अतिवृष्टीने चार हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान

■ महासागर प्रतिनिधी,

**गोंदिया,** दि. १३: जिल्ह्यात सोमवारी आणि मंगळवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे पूर परिस्थिती निर्माण होऊन शेकड़ो हेक्टरमधील पिके पाण्याखाली आली होती. परिणामी मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याचा अंदाज वर्तविला जात होता. कृषी विभागाच्या यंत्रणेने केलेल्या प्राथमिक सर्वेक्षणात जिल्ह्यातील ४ हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाल्याचे पुढे आले असून या नुकसानीत पुन्हा वाढ होण्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे. अतिवृष्टीमुळे गोंदिया, तिरोडा, सालेकसा, आमगाव, देवरी व सडक अर्जुनी तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. बुधवारपासून पावसाने विश्रांती घेतल्याने पूरबाधित गावात मदत कार्याला प्रशासनाने सुरुवात केली होती. वैनगंगा आणि बाघ नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने तिरोडा आणि गोंदिया तालुक्यात बुधवारी पूर परिस्थिती कायम होती. मात्र गुरुवारी (दि.१२) या दोन्ही तालुक्यातील पूर असून ओसरल्याने जनजीवन पूर्वपदावर आले. मात्र अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात घरांची पडझड झाली असून पिकांचेसुद्धा नुकसान झाले आहे. पूर आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण कृषी व महसुल विभागाच्या यंत्रणेच्या माध्यमातून जिल्ह्यात सुरू आहे. कृषी विभागाने केलेल्या प्राथमिक सर्वेक्षणात ४ हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाल्याचे पुढे आले आहे. मात्र या आकड्यात पुन्हा वाढ होण्याची शक्यता कृषी विभागाने वर्तविली आहे. पिकांचे सर्वाधिक नुकसान गोंदिया, तिरोडा, सालेकसा, आमगाव, देवरी या तालुक्यात झाल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अभिजित आडसुळे यांनी लोकमतशी बोलताना सांगितले.

**पुराने घेतला पाच जणांचा बळी**

संततधार पावसामुळे पूर परिस्थिती निर्माण झाल्याने नाल्यात वाहून गेल्याने जिल्ह्यात ठिकठिकाणी पाच जणांचा मृत्यू झाला आहे. याची नोंद जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग व पोलिस प्रशासनाने घेतली आहे. पंचनामे युद्धपातळीवर करा

अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण युद्ध पातळीवर करून नुकसानग्रस्तांना त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी व नुकसानग्रस्तांकडून केली जात आहे.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **JUZER GANDHI.** MY NEW NAME IS **JUZER SAIFUDDIN EZZY.** **ADD:** BANGALI PANJA BUDHWARI, ITWARI, NAGPUR

MY OLD NAME WAS **NASIMA-BANO AMANKHAN PATHAN.** MY NEW NAME IS **NASIM AMAN KHAN.** **ADD:** PLOT NO 24 FLAT NO 301, BRICKSTONE APARTMENT NAGPUR 440030

MY OLD NAME WAS **NAJMUNNISA SHAFI KHAN PATHAN.** MY NEW NAME IS **NAZAMA MOHB SHAFI KHAN.** **ADD:** WARD NO 01 AMRAVATI ROAD, NEAR SAPANA BAZAR, KALMESHWAR , NAGPUR 441501

**कार्यालय नगरपरिषद वानाडोंगरी**

ता. हिंगणा, जि. नागपुर

Email:mewanadongari2016@gmail.com

जावक क्र./ न.प.वा./ स्व.वि./ २३६९/२०२४ दिनांक : १३/०९/२०२४

**ई-निविदा सूचना**

नगर परिषद वानाडोंगरी जि. नागपूर यांच्या वतीने १५ वित्त आयोग व नगर परिषद निधी अंतर्गत खालील कामाच्या ई-निविदा दोन लिफाफा पद्धतीने योग्य त्या वर्गातील पंजीबद्ध कंत्राटदाराकडुन / पुरवठा धारकांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. कामाच्या निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाच्या आहे. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://Mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. १३/०९/२०२४ ला ३.०० वाजता पासुन पाहण्यास उपलब्ध राहील.

मुख्याधिकारी
नगरपरिषद वानाडोंगरी


# नागरिकांना एकाच छताखाली मिळणार विविध योजनांचा लाभ

### १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर या कालावधीत सेवा पंधरवाड्याचे आयोजन

**0 महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १३ :** राष्ट्रपिता महात्मा गांधी याच्या जयंतीचे औचित्य साधून वर्धा विधानसभा क्षेत्रातील नागरिकांसाठी विकास भवन येथे दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर या कालावधीत सेवा पंधरवाड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सेवा पंधरवाड्या दरम्यान महसूल विभागाच्या सेवा, कृषि विभागाच्या योजना, पंचायत समितीच्या योजना व समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनांचा लाभ एकाच छाताखाली मिळणार आहे. या सेवा पंधरवाड्या दरम्यान महसूल विभागाच्या सेवा, कृषि विभागाच्या योजना, पंचायत समितीच्या योजना व समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणा-यमोजनांचा लाभ एकाच छाताखाली मिळणार आहे. यासाठी नागरिकांनी सेवा पंधरवाड्यात उपस्थित राहून योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सेवा पंधरवाड्या दरम्यान विविध योजनाचा लाभ नागरिकांना देता यावा यासाठी संबंधीत विभागांनी सेवा पंधरवाडा कालावधीत योजनेच्या माहितीसह सकाळी ४.४५ ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत उपस्थित राहून लाभार्थ्यांना लाभ द्यावा, असे उपविभागीय अधिकारी दिपक कारंडे यांनी कळविले आहे.


**ZILLA PARISHAD CHANDRAPUR (HEALTH DEPARTMENT)**

**NOTICE FOR TENDER**

**(पहीली वेळ)**

**Title Of Purchase: Supply of Ambulance In 13 Primary Health Centre**

ZILLA PARISHAD CHANDRAPUR (Govt. of Maharashtra) Health Department Invites Proposals From Reputed And Experienced Companies To Participate In The Competitive Bidding Process To Supply of Ambulance in 13 Primary Health Centre

For The Detailed Tender Document, Interested Bidders Should Visit https://gem.gov.in/

Tender Submission Would Be Online And The Deadline To Submit The Proposals Is On before Dated: 23.09.2024

Sd/-
Chief Executive Officer
Zilla Parishad, Chandrapur

**निविदा सूचना क्रमांक - ०७/२०२४-२५**

मुख्याधिकारी, नगर परिषद उमरेड, जिल्हा नागपुर यांच्या वतीने खालील नमुद कामाकरिता करण्याकरीता बी १ टक्केवारीतील निविदा सुचनानुसार माहाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे योग्य ते वर्गवरीत मध्ये नोंदनीकृत असलेल्या व अनुभवी कंत्राटदाराकडुन सर्वसाधारण रस्ता अनुदान योजना अंतर्गत १२ कामाची निविदा मागविण्यात येत आहे. नगर परिषद उमरेड येथे दिनांक १३/०९/२०२४ ला सायं ५.०० वाजेपासून पाहण्यास उपलब्ध आहे. निविदा दस्ताऐवज दाखल करण्याचा कालावधी दि. १७/०९/२०२४ ते दि. २५/०९/२०२४ वेळ सायं. ५.०० वाजेपर्यंत असेल. निविदा लिफाफर क्र. २ उघडण्याचा दि.२५/०९/२०२४ वेळ सायं. ५.०० वाजता असेल.

(अर्चना मेंडे)
मुख्याधिकारी
नगर परिषद उमरेड


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

महासागर

नागपूर

वृत्तसागर

■ शनिवार, दि. १४ सप्टेंबर २०२४ ■

# नक्षल प्रकरणात अडकवलेल्या महिलेची उच्च न्यायालयाकडून निर्दोष सुटका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

पोलीस नोंदणीमधील नावांच्या व्यक्तींना नक्षल चकमकीत गोळीबार करणारे आरोपी ठरवण्याची किमया गडचिरोली पोलिसांनी केली आहे, असे निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका महिलेची तिच्यावरील आरोपातून निर्दोष सुटका केली.

नक्षलवाद्यांसोबत चकमकीची पोलिसांनी सांगितलेली कथा विश्वसनीय नसल्याचे परखड मत नोंदवत याआधी सत्र न्यायालयाने आरोपी महिलेला दिलेली शिक्षा उच्च न्यायालयाने रद्द केली. न्या. गोविंद सानप यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

अहेरी तालुक्यातील कोपर्शीच्या घनदाट जंगलांमध्ये २० मे २०१९ रोजी नक्षलवादी विरोधी पथक गस्त घालत होते. या पथकात ६० शस्त्रधारी पोलिसांचा समावेश होता. पोलिसांनी केलेल्या आरोपानुसार, गस्त घालताना सकाळी नक्षलवाद्यांच्या एका गटाने बेधुंद गोळीबार केला. पोलिसांनीही त्याला गोळीबार करून उत्तर दिले . त्यामुळे नक्षलवाद्यांनी पळ काढला. पोलिसांनी ११ जानेवारी २०२० रोजी याप्रकरणी याचिकाकर्ती आरोपी पार्वती शंकर मडावी हिला अटक केली. पार्वती २०१७ मधील एका प्रकरणात न्यायालयीन कोठडीत होती.
नक्षल चकमकीच्या या प्रकरणात केवळ पार्वतीला अटक झाली आणि तिच्यावर खटला चालवण्यात आला. तिला अडकवण्यात येत असल्याचा युक्तिवाद पार्वतीने केला, मात्र गडचिरोली सत्र न्यायालयाने १६ फेब्रुवारी २०२१ रोजी तिला दहा वर्षांची शिक्षा ठोठावली. सत्र न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात पार्वतीने उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. सत्र न्यायालयाने निर्णय देताना अनेक महत्वपूर्ण बाबींकडे दुर्लक्ष केले असल्याचे मत नोंदवित सत्र न्यायालयाचा निर्णय रद्द केला. याचिकाकर्ती महिलाच्यावतीने ॲड.एच.पी.लिंगायत यांनी बाजू मांडली. राज्य शासनाच्यावतीने ॲड.एच.एस.धांडे यांनी युक्तिवाद केला.

### पोलीस कारवाईवर प्रश्नचिन्ह

नक्षवाद्यांवर जोरदार गोळीबार केल्याचा दावा पोलिसांनी केला. मात्र, या गोळीबारात ना पोलिसांकडून, ना नक्षलवाद्यांकडून कुणीही जखमी झाले किंवा कुणाचा मृत्यू झाला. घटनास्थळावरून बंदुकीच्या गोळ्या जप्त करण्यात आल्या नाहीत. चकमक झालेल्या परिसरातील झाडांवर देखील गोळीबाराची खूण सापडली नाही. पोलिसांमध्ये आणि नक्षलवाद्यांमध्ये किती अंतर होते?

६० शस्त्रधारी पोलीस होते आणि त्यांना आरोपी महिला दिसली तर त्यांनी तिच्यावर गोळीबार केला का नाही, असे विविध सवाल न्यायालयाने उपस्थित केले. बेधुंद गोळीबार सुरू असताना नक्षलवादी समोर आले आणि पोलिसांनी त्यांना बघितले ही कथाच अविश्वसनीय असल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले आणि आरोपी महिलेची तात्काळ सुटका करण्याचे आदेश दिले.

# केदारांकडून पैसे वसुलीसाठी आशिष देशमुख यांनी उघडला मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

महायुतीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस आमने-सामने आले आहेत. नागपूरमध्ये सुनील केदार यांच्याविरोधात भाजप आक्रमक झाली आहे. यामुळे महायुतीत अजितदादा गटाविरोधात भाजप असा सामना रंगला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या घोटाळ्यामध्ये केदारांकडून पैसे वसुलीसाठी भाजपचे नेते आशिष देशमुख यांनी मोर्चा उघडला आहे.



नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या घोटाळ्यामध्ये सुनील केदार यांना न्यायालयाने दोषी ठरवलं पाच वर्षाची सजादेखील देण्यात आली 22 वर्षानंतर 1444 कोटी रुपयांची वसुली हे त्यांच्या कडून होण्यासंदर्भात सहकार विभागाने आणि सहकारमंत्र्यांनी दिरंगाई केली. त्या विरोधात आज नागपूरच्या रामटेक तालुक्यात पीडित शेतकऱ्यांचा आणि खातेधारकांचा मोर्चा आयोजित करण्यात आल्याची माहिती आशिष देशमुख यांनी दिली.

दिलीप वळसे पाटलांना आहे की, त्यांनी तांत्रिक अडचणी दाखवत सुनील केदार वेळ काढत आहे त्यावर आपण ऑर्डर का करत नाही? यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहे. वळसे पाटलांना विनंती आहे की त्यांनी या संदर्भातला ऑर्डर लवकरात लवकर काढावा जेणेकरून 1444 कोटी रुपये वसूल करून शेतकऱ्यांना आणि खातेदारकांना वितरित करण्यात येईल, असे देशमुख म्हणाले.

### धनंजय मुंडे यांच्यावर फैरी

धनंजय मुंडे हे कृषिमंत्री आहे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आहेत त्यांनी विदर्भातील शेतकरी संत्रा मोसंबी उत्पादक शेतकरी यांची पळगळ झाली होती त्याची नुकसान भरपाई अजून सरकारने दिली नाही. त्यांच्याकडून मीटिंग लावून घेतली मात्र ती मीटिंग ऐनवेळी अनिल देशमुख यांच्या दबावावर कॅन्सल करण्यात आले अनिल देशमुख यांच्या दबावावर धनंजय मुंडे आणि सुनील केदार यांच्या दबावाखाली दिलीप वळसे पाटील वेळ काळूपणा करत आहे. यावरून राजकारण होताना दिसते असं माझं मत आहे, अशी प्रतिक्रिया आशिष देशमुख यांनी दिली. सुनील केदार यांचे दिलीप वळसे सोबत असलेले जुने संबंध आणि अनिल देशमुख यांचे धनंजय मुंडे सोबत असलेले जुने संबंध यातून वेळ काढून पणा होत आहे. मात्र यामुळे विदर्भाच्या शेतकऱ्यांचा नुकसान होत आहे. शेतकरी अडचणीत असताना सुद्धा ते मंत्री कारवाई करण्यात टाळाटाळ करतात माझी विनंती आहे दिलीप वळसे पाटील आणि धनंजय मुंडे यांनी आमचे शेतकऱ्यांचे हाक ऐकावी आणि त्यांना न्याय देण्यासाठी कार्यवाही करावी, अशी मागणी देशमुखांनी केली.

## आपदा मित्र उपक्रमासाठी एकूण ९२६ अर्ज प्राप्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

शहरात उद्भवणाऱ्या आपत्ती व अतिवृष्टी कालावधीत सहकार्य करण्यासाठी मनपाच्या अग्निशमन व आपत्कालीन विभागाद्वारे ह्रआपदा मित्र/सखी" उपक्रम राबविण्यात येणार असून, उपक्रमाला सर्वसामान्य नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. उपक्रमात सहभागी होण्यास इच्छुक उमेदवाराचे एकूण ९२६ अर्ज मनपाला प्राप्त झाले आहेत.
मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात व अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या नेतृत्वात शहरात आपदा मित्र उपक्रम राबविण्यात येत आहे.

उपक्रमाबद्दल माहिती देत मुख्य अग्निशमन अधिकारी बी.पी. चंदनखेडे यांनी सांगितले की, केंद्र शासनाकडून प्राप्त दिशानिर्देशानुसार शहरात 'आपदा मित्र' ची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे. शहरातील दहाही झोनमध्ये प्रत्येकी १५ याप्रमाणे एकूण १५० 'आपदा मित्र' ची निवड केली जाणार आहे.

शहरात उद्भवणाऱ्या आपत्ती व अतिवृष्टी समयी प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी आपदा मित्र मदत करणार आहेत. सहभागी होण्यासाठी अर्ज आमंत्रित करण्यात आले होते. त्यानुसार एकूण १५० पदांकरिता ९२६ अर्ज प्राप्त झाले आहेत. यातून आपदा मित्र यांची निवड करण्यात येणार आहे.

# रामचंद्र महाराजांचा पालखी सोहळा आज



■ महासागर प्रतिनिधी
बेला, दि. १३ :

पंचक्रोशीत नावलौकिक असलेल्या श्री संत बालयोगी रामचंद्र महाराज यांचा समाधी सोहळा आज शनिवारला कडाजना येथे मोठ्या धार्मिक व भक्तिमय वातावरणात पार पडत आहे. यानिमित्त अखंड हरिनामाचा सप्ताह सुरू झाला असून हजारोच्या संख्येने भाविक भक्त दर्शनाला येत आहे.

वेना नदी तीरावर निसर्गरम्य असलेल्या कडाजना या डोंगरावर महाराजांनी तपसाधना केली होती व इथेच 2012 ला वैकुंठवासी झाले . तेव्हापासून हा समाधी सोहळा आध्यात्मिक धार्मिक वातावरणात हजारो भक्तगण साजरा करतात. महाराष्ट्र शासनाणे तीर्थक्षेत्र क मध्ये समाविष्ट केल्याने अनेक विकासाची कामे इथे झाली आहेत . लहान मुलांना आध्यात्मिक ज्ञानाचे ( शिक्षणाचे ) धडे देण्यासाठी वरदा ज्ञानपीठ येथे निवासी स्वरूपात कार्यरत आहे. कधीही न आटणारा पाण्याचा डोह याच तीर्थक्षेत्रात असून खडकावरून वाहणाऱ्या पाण्याचा आवाज भक्तगणाला भक्तिमय करून नादब्रह्म निर्माण करून सोडतो. 16 सप्टेंबरला हभप लक्ष्मणराव गुडवार महाराज यांचे महाप्रसादाचे कीर्तन आयोजित करण्यात आले. पंचकोशीतील लाखो लोक या महाप्रसादाचा आनंद घेत असून पोलिसांचीअतिरिक्त राखीव तुकडी सुद्धा चोख व्यवस्था सांभाळते. भाविक भक्तांनी महाप्रसादाचा आनंद घ्यावा असे पंच कमेटीने प्रसिद्धी पत्रकात आव्हान केले आहे.

रामचंद्र महाराज यांच्या समाधी सोहळ्याचे हे बारावे वर्ष असून लाखो लोक गावात येत असल्याने व गावभर दिंडी यात्रा फिरत असल्याने बेलाचा शनिवार आठवडी बाजार शुक्रवारलाच भरला. तसे प्रशासनाने एका दवंडीद्वारे सांगितले होते.

## नागपूर हिट अँड रन फॉरेन्सिक चाचणी होणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

नागपूरच्या हिट अँड रन प्रकरणात आता आणखी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. नागपूर पोलिसांनी लाहोरी रेस्टॉरंट अँड बारमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले आहेत.

मात्र या सीसीटीव्हीच्या फुटेजमध्ये संकेत बावनकुळे, अर्जुन हावरे, रोनित चिंतमवार आणि आणखी एक तरुण हे चौघेही दिसत नाहीत.

संबंधित हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज लाईव्हमध्ये पाहण्याची सोय असून त्याचे रेकॉर्डिंग डीव्हीआरमध्ये झालेले नाही. त्यामुळे पोलिसांनी हॉटेलमध्ये जाऊन सीसीटीव्ही फुटेज शोधण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र यात कुठेही हे चौघेजण दिसले नाहीत.

पोलिसांनी आता हॉटेलचे डीव्हीआर जप्त केले असून फॉरेन्सिक चाचणी देखील करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# मनपातील ११० कर्मचाऱ्यांचे रक्तदान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

नागपूर महानगरपलिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी केलेल्या रक्तदानाच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नागपूर शहरात रक्ताचा तुडवडा जाणवू नये याकरिता नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन यांनी गणेशोत्सव मंडळांना आपल्या मंडळात रक्तदान शिबिर आयोजित करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार विविध शिबिरांद्वारे आजवर 461 इतके युनिट रक्त संकलित करण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाद्वारे अर्पण व्हॉलंटरी रक्तपेढीच्या सहकार्याने गणेशोत्सवानिमित्त रक्तदान जनजागृती करीत शुक्रवारी मनपा मुख्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल, नागपूर स्मार्ट



सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा- चांडक, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सदाशिव शेळके, मुख्य अग्नीशमन अधिकारी बी.पी चंदनखेडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. मनपातील शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शवित 110 कर्मचाऱ्यांनी केले रक्तदान केले. याप्रसंगी आयुक्तांनी मार्गदर्शन केले.

आयुक्तांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत मनपातील अधिकारी व कर्मचार्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला. मनपाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सदाशिव शेळके, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दिपक सेलोकर, सहायक आयुक्त श्री. श्याम कापसे यांच्यासह इतर अग्नीशमन विभागाच्या जवानांनी व पत्रकार प्रसून चक्रवर्ती यांनी रक्तदान केले.

## कॉटन मार्केट मेळाव्यात तूफान गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

नागपूर शहराच्या मध्यभागी असलेल्या कॉटन मार्केट परिसरातील सार्वजनिक गणेश मंडळाला भेट देणाऱ्या भाविकांची संख्या वाढत असून, येथे लावण्यात आलेल्या मेळाव्यात नागरिकांची गर्दी वाढू लागली आहे.

सततच्या पावसामुळे गुरूवारपर्यंत फारसा प्रतिसाद नव्हता. परंतु, शुक्रवारी येथे हजारोच्या संख्येने भाविक आणि नागरिक सहभागी झाल्याचे दिसून आले.

# प्रतिभेला मेहनतीचे बळ देत नीरज बनल्या शेफ

■ सुजाता बंडावार, नागपूर, दि. १३ :

बालपणापासूनच पंचपक्वान्न बनवण्याचा व शिकण्याचा असणारा छंद आणि त्यांची पहिली गुरु आईच्या मार्गदर्शनात संपन्न होत चाललेल्या प्रतिभेला सासरे व पती यांच्या सकारात्मक प्रतिसादाचे पंख मिळाले आणि साध्या गृहिणी असलेल्या नीरज जैन संपूर्ण भारतातील प्रसिद्ध शेफच्या पंगतीतच जाऊन बसल्या नाही तर आपल्या स्वादाची अविट गोडी पसरवीत निराली कुकरी अँड बेकरी इन्स्टिट्यूटच्या संचालिका बनल्या.

पंचविशीत लग्न झालेल्या नीरज यांना पाककलेत असलेली सर्जनशीलता त्यांना खुणावत होती. अशातच नागपुरात मिठाई बनविण्याच्या वर्कशॉप मधून त्यांना लक्षात आले की त्या पाककला उत्तम प्रकारे शिकवू शकतात मग त्यांनी हा शब्द सासऱ्यांसमोर ठेवला आणि पति व सासऱ्यांकडून त्यांना सकारात्मक पुष्टी मिळाली आणि त्यांनीही कंबर कसली.

सर्वात प्रथम त्यांच्या माहेरी मध्य प्रदेशच्या सिवनी येथे मिठाई बनविण्याचे पहिले वर्कशॉप घेतले व 65 प्रशिक्षणार्थ्यांनी याला भरभरून प्रतिसाद दिला. येथून सुरू झालेली घोडदौड निराली कुकरी अँड बेकरी इन्स्टिट्यूट मध्ये रूपांतरित होऊन देशभरात घेण्यात आलेल्या 1000 कुकरी शोज मध्ये परावर्तित झाली. हे इन्स्टिट्यूट आता वटवृक्ष झाले असून या इन्स्टिट्यूट मधून एक लाख प्रशिक्षणार्थ्यांनी पाक कौशल्य प्राप्त केले आहे.

### स्पर्धेत टिकण्यासाठी रचनात्मकता

पाककलेचा प्रवास सुरू असताना त्यांना लक्षात आले की या स्पर्धेत टिकायचे असेल तर प्रत्येक पदार्थांमध्ये रचनात्मकता व विविधता आणायला हवी. विद्यार्थ्यांना एकच पदार्थ वेगवेगळ्या पद्धतीने कसा शिकवता येईल याचा सर्जनशील वृत्तीने अभ्यास व संशोधन करून त्या विद्यार्थ्यांचे सर्व अंगाने कौशल्य विकसित करतात. त्यामुळेच आज संपूर्ण देशात त्यांच्या इन्स्टिट्यूट चे नाव प्रथम क्रमांकाने घेतल्या जाते.

### सिटी अँड गिल्डस् लंडन युनिव्हर्सिटीद्वारा मान्यता

निराली कुकरी इन्स्टिट्यूट मध्य भारतातील पहिली अशी बेकरी प्रशिक्षण संस्था आहे ज्याला सिटी अँड गिल्डस् लंडन युनिव्हर्सिटी व फूड इंडस्ट्री कॅपॅसिटी



ॲण्ड स्किल इनिशिएटिव्ह द्वारा मान्यता मिळाली आहे.

हा कोर्स तीन महिने, सहा महिने व एक वर्षाचा असून येथून निघालेल्या विद्यार्थ्यांना जगातील हॉटेल्स मध्ये संधी उपलब्ध आहेत. याशिवाय येथे एक दिवसापासून, एक आठवड्यापासून तर तीन महिने, सहा महिने व एक वर्षापर्यंतचे विविध पाककला प्रकारांचे शासकीय व बिनशास कीय सर्टिफिकेट कोर्सेस उपलब्ध आहेत.

येथून शिकून निघालेले विद्यार्थी व गृहिणी विविध हॉटेल्स मध्ये शेप म्हणून व स्वतःचा व्यवसाय थाटला आहे. नागपूर मध्ये असलेल्या त्यांच्या या इन्स्टिट्यूट मध्ये देशभरातील विद्यार्थी प्रशिक्षण घेण्याकरिता येतात.

### चॉकलेट बुकेने दिली ओळख

व्यवसायाची सुरुवात केल्यानंतर त्यांना जाणवले की या क्षेत्रात ग्राहकांना आकर्षित करायचे असेल तर काहीतरी नाविन्यपूर्ण केले पाहिजे आणि यातूनच नीरज जैन यांच्या सर्जनशील बुद्धीतून चॉकलेट बुकेची निर्मिती झाली, त्यासाठी लागणाऱ्या प्रत्येक वस्तूचे संशोधन व बारीक अभ्यास केला आणि ही कलाकृती त्यांना प्रसिद्धीकडे घेऊन गेली व अनेक वृत्तपत्रे व सामाजिक माध्यमांनी त्यांच्या या कलाकृतीचे कव्हरेज दिले यातूनच निराली चॉकलेट अकादमीचे एक मोठे नाव निर्माण झाले आहे.

### स्टार्ट अप सुरू करणाऱ्यांना मार्गदर्शन

तुमच्या हातात कसब असेल व स्वतःवर विश्वास व मेहनत घेण्याची तयारी असेल याच बरोबर दुसऱ्यांशी तुमची वागणूक आदराची व संयमी असेल तर या क्षेत्रात कुणीही आपला जबर बसवु शकतो. या क्षेत्रात पाऊल टाकणाऱ्यांनी प्रथम आपल्या व्यवसायाची संपूर्ण माहिती घेऊन संपूर्ण शेड्युल व बजेट तयार केले पाहिजे व नंतरच या क्षेत्रात पाऊल ठेवले पाहिजे. असे त्यांनी मार्गदर्शन केले.

### नीरज यांच्या उपलब्धी

जिद्द, कठोर श्रम व तेवढ्याच आपल्या विद्यार्थ्यांशी मृदू असलेल्या निर्जन यांचा प्रवास त्यांना विविध पुरस्कार प्राप्तीपर्यंत घेऊन गेला. त्यांना मनपा नागपूरचा वुमन एंटरप्रेनर अवॉर्ड, विदर्भ इंडस्ट्रियल असोसिएशनचा बेस्ट लेडी एंटरप्रेनर अवॉर्ड, 94.3 माय एफएम विदर्भ गौरव चा भास्कर एक्सलन्स अवार्ड असे विविध पुरस्काराच्या त्या मानकरी आहेत सोबतच त्यांनी 500 विद्यार्थ्यांची एकाच दिवशी केक बनवण्याची स्पर्धा घेऊन त्या इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड व एशिया बुक ऑफ रेकॉर्ड होल्डर ठरल्या आहेत.

# गांधीबाग सुत व हँडलूम मार्केट गणेश उत्सवात उसळते आहे भाविकांची अलोट गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

आजच्या सोशल मीडियाच्या काळात तरुण पिढीमध्ये वाढत चाललेल्या असामाजिक तत्त्वांचा ऱ्हास करून मुख्यत्वे हिंदू धर्मीय तत्वांना प्रोत्साहित करण्याच्या व तरुणांना एकत्रित आणून सामाजिक दायित्व जपण्याच्या उद्देशाने प्रेरित होऊन 2001 सालि गांधीबाग सुत-एवम हॅण्डलूम मार्केट गणेश उत्सव मंडळाची स्थापना झाली आणि 23 वे वर्ष यंदा बद्रीनाथ धामच्या शंकराच्या रूपातील गणेश मूतीर्ची स्थापना करून साजरे करण्यात येत आहे.

बद्रीनाथ येथील नंदी महाराजांवर बसलेल्या एका हातात त्रिशूल व एका हातात फरसा अस्त्र असणाऱ्या भव्य व आकर्षक गणेश मूतीर्ची स्थापना यंदा करण्यात आली आहे. कोरोना काळापासून बारा ज्योतिर्लिंग व चारधाम येथील शंकराची पिंड व मूर्तीच्या प्रतिकृती गणेशाची स्थापना करण्याचे ध्येय या गणेश मंडळांनी ठरविले असून त्याप्रमाणे यापूर्वी अमरनाथ व केदारनाथ येथील देखावा सजविण्यात आला होता.

या प्रत्येकच देखाव्याची भक्तांकडून सराहना होऊन लोकांची तुंबळ गर्दी जमत आहे. यंदा 4000 च्या घरात भाविक गणेशाचे दर्शन घेण्यासाठी सकाळचे चार वाजेपर्यंत गर्दी करीत आहेत.

व्यापारी संकुलात स्थापित या गणेश मंडळाच्या स्थापनेसाठी व्यापारी वगार्तून व मंडळाच्या सदस्यांकडून स्वेच्छेने जमावण्यात आलेल्या चार लाख रुपयांच्या निधीतून यंदाचा गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. सामाजिक दायित्व जपत यंदा टी-शर्टचे वाटप व महिलांना सौंदर्यवर्धक मेडिमिक्स क्रीमचे वाटप करण्यात आले. याशिवाय येथे रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात येणार आहे. येथे आरती व पूजा पाठासाठी अतिथींना बोलावण्याची परंपरा असून ती



कायम राखली आहे.

येथे खासदार नितीन गडकरी, आमदार विकास कुंभारे, भाजपाचे नेते प्रवीण द टके याशिवाय बजरंग दल, विश्व हिंदू परिषदेचे मोठमोठे नेते गणरायाचे दर्शन घेण्यासाठी वर्णी लावतात. याशिवाय पोलिस आयुक्त रवींद्र सिंगल यांचीही वेळ मिळालेली आहे.

स्व. अतुल डहरवाल यांच्या मार्गदर्शनाचा आदर्श ठेवून व त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन या मंडळाद्वारे वर्षभर गणेशोत्सवाव्यतिरिक्त विविध सामाजिक उपक्रम राबविल्या जातात. यामध्ये हनुमान जयंतीला मोठ्या प्रमाणात प्रसादाचे वाटप होते. रामनवमीला निघणाऱ्या शोभायात्रेचे भव्य स्वागत केले जाते.

शिवाय गोकुळाष्टमीला दहीहंडीचा मोठा कार्यक्रम घेण्यात येतो. भाजप युवा मोर्चाचे कोषाध्यक्ष सागर रहाटे, मध्य नागपूर भाजपचे उपाध्यक्ष मिलन राय यांच्या अध्यक्षतेखाली व सचिव व कोषाध्यक्ष अनिकेत अग्रवाल व सदस्य अभिषेक बारापात्रे, निखिल हेडाऊ, अखिल डहरवाल, दीपक राठोड, कुलदीप दुबे, शुभम बारस्कर, संदीप लीडर, राहुल अडुलकर, प्रवीण वाघेला, आयुष सराफ, आयुष केवलकर, कार्तिक केवलकर, राहुल गौर, रवी राठोड, सारंग ठाकूर यांच्या संयोगाने मोठ्या उत्साहाने गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे.

# गुडघाभर पाण्यातून मार्गक्रमण काढून जावे लागते अंत्यसंस्कारासाठी



तालुक्यातील अरोली येथील प्रकार

■ महासागर प्रतिनिधी,
मौदा, दि. १३ :

तालुक्यातील अरोली हे महत्त्वाचे व लोकसंख्येच्या दृष्टीने मोठे गाव आहे. या गावात एखाद्याचे निधन झाल्यास त्याचे अंत्यसंस्कार करण्यासाठी जवळ असलेल्या सुर नदीच्या पात्रातील गूढगभर पाण्यातून अंत्ययात्रा न्यावी लागते. मरणानंतरही त्या व्यक्तीला सोसाव्या लागतात मरण यातना असे चित्र दिसून येते, याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांना काहीच घेणे देणे नसून आजही ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी हे चित्र असल्याचे दिसून येत आहे.

सूर नदीला खिंडशी जलाशयाचे पाणी नदीला सोडले जाते तेव्हा नदीला पावसाळ्यात गुळगा भर पाणी असते. पावसाळ्यात एखाद्याचे निधन झाल्यास त्याचा अंत्यसंस्कार करण्यासाठी मोठी फजिती होते. तरीही अनेक नागरिक ती अंत्ययात्रा खांद्यावर घेऊन गूढगाभर पाण्यामधून ती स्मशानभूमीत न्यावी लागते. याच अंत्ययात्रेला अनेक लोकप्रतिनिधी यांची उपस्थिती असते परंतु त्यांनाही गूढगभर पाण्यातून प्रवास करत जावे लागते, तरीसुद्धा हे चित्र दिसूनही न पाहल्यासारखं करून या समस्येवर तोडगा काढत नसल्याने अरोलीकरांचे मृत्यूनंतरही हाल थांबत नाही.

सूर नदीच्या पुलाची उंची कमी असल्याने त्याची उंची वाढविण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी होत आहे. शासन गावं विकासासाठी करोडो रुपये खर्च करतो परंतू स्मशानभूमीत जातांना मुख्य रस्त्याच्या विकासासाठी त्याचाही विचार शासन करीत नसेल तर गावात लाखो रुपये खर्च करून त्यांचा काय उपयोग? हा प्रश्न जनतेला पडतो आहे.

अंत्यसंस्कार करण्यासाठी अनेक नागरिक लोकप्रतिनिधी सुर नदीच्या पात्रातून पाण्याची भीती वाटत असल्यामुळे ते त्या ठिकाणी न जाता नदीच्या पात्र जवळ उभे राहून दुरवरूनच श्रद्धांजली अर्पण करून निघून जातात. हे चित्र जेव्हा नातेवाईक किंव्हा बाहेरून येणारे नागरिक उघड्या डोळ्यांनी पाहतात तेव्हा अनेकांच्या मनात येथील लोकप्रतिनिधी यांच्या विषयी मोठा रोष व्यक्त करण्यात येतो. म्हणूनच रोज मरे त्याला कोण रडे या मनीप्रमाणे अंत्यविधीतून परत आल्यावर पुन्हा जैसे थे असा हा विषय झालेला असतो.

## सावनेर पो.स्टे.च्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. १३ :

पोलीस स्टेशनच्या वतीने सावनेर तहसील कार्यालय येथे शुक्रवारला भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले या शिबिरात शहर व ग्रामीण भागातील सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ, पोलीस पाटील, शासकीय कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते रक्त साठा नागपूर येथील लाईफ लाईन ब्लड सेंटर वतीने घेण्यात आले सदर शिबिरामध्ये 100 व्यक्तींनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन सहायक पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांनी केले तर शिबीराचे अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी संपत खलाटे होते यावेळी पीआय उमेश पाटील, पंस सभापती गोविंदा ठाकरे, पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष गहरवार, पीएसआय गेडाम, पीएसआय राठोड खुपीया प्रमुख सुनील तलमले, जमादार सुरेन्द्र वासनीक होते.

# विदर्भ गौरव सन्मानाने चंद्रशेखर अरगुलेवार, एम.ए. जब्बार, राजेन्द्र बावनकुळे सन्मानित



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १३ :

तेजस बहुउद्देशीय संस्थाच्य कार्य पाहुण जागोजागी संपूर्ण भारतात लोक सन्मान करत आहे. नेहमी चालू असणारे तेजस संस्थाचे कार्याची दखल घेऊन लोक मानसम्मान करत आहे.

युवकांसाठी मोफत पोलीस प्रशिक्षण, सैन्य प्रशिक्षण, निमलष्करी प्रशिक्षण आणि दरवर्षी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर सर्व धर्मीयांचे मोफत सामूहिक विवाह व वैद्यकीय उपचार, ७ वर्षांपासून समाजासाठी अनेक उपक्रम राबवत आहे. रस्त्यावर फिरणाऱ्या वेड्यांना (पागल) सर्व प्रकारची सेवा व मदत देण्याबरोबरच, भुकेल्यांना दर महिन्याला धान्य व किराणा वाटप, प्रत्येक क्षेत्रात मदत करणाऱ्या तेजस संस्थेमध्ये आशेचा किरण चालू आहे.

२४ तारखेला संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार, संस्था मार्गदर्शक व संपादक एम ए जब्बार आणि पत्रकार/शाहीर राजेन्द्र बावनकुडे यांच्या महाराष्ट्र एस.आर.एन. फिल्म्स प्रॉडक्शन न्यूज इंडीया 24 व जनग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र यांचे संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर इंदोरा नागपूर येथे विदर्भ गौरव सन्मान पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सामाजिक क्षेत्रात काम करणारे सामाजिक कार्यकर्ते, पत्रकारिता क्षेत्रात काम करणारे पत्रकार, पोलीस कर्मचारी यांचा गौरव करण्यात आला.

यामध्ये तेजस संस्थाचे चंद्रशेखर अरगुलेवार, एम.ए. जब्बार, राजेंद्र बावनकुडे, यांचा सत्कार भारत सरकारच्या केंद्रीय सेन्सॉर बोडार्चे सदस्य संजय भाकरे, टीव्ही अभिनेत्री रश्मी देशमुख, राधाकृष्ण हॉस्पिटल वर्धमाननगरचे संचालक गोविंद पोद्दार आणि इतर मान्यवरांच्या हस्ते शाल, गुलदस्ता, मोमेंटो देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अरगुलेवार म्हणाले, हा सत्कार आमचा नसुन तेजस संस्थाचे दानवीर, सहयोगी, पत्रकार बंधु, मित्रगणांचा सत्कार आहे.

## वंदे भारत धावण्यास सज्ज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

चेन्नई येथील कोच फॅक्टरीमधून आज नागपुरात नारंगी रंगाची १६ डब्यांची वंदे भारत एक्सप्रेस गाडी दाखल झाली आहे. नागपूर ते सिकंदराबाद दरम्यान धावणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसला १६ सप्टेंबरला दूरदृश्य प्रणालीद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हिरवी झेंडी दाखवणार आहे.

ही गाडी मंगळवार वगळता दररोज धावणार आहे. सध्या नागपूरला पोहोचण्यासाठी या प्रवासाला ८ तास लागतात. मात्र, वंदे भारत एक्स्प्रेसला ७ तास १५ मिनिटे लागतील. ही गाडी नागपूरहून पहाटे ५ ला निघेल आणि दुपारी १२.१५ ला सिकंदराबादला पोहोचेल. या गाडीला सेवाग्राम, चंद्रपूर, बल्लारशाह, रामागुंडम आणि काझीपेठ स्थानकांवर थांबा देण्यात येणार आहे.

वंदे भारत एक्सप्रेस परतीच्या प्रवासात सिकंदराबाद पासून दुपारी १ वाजता निघेल आणि नागपूरला रात्री ८.२० वाजता पोहोचेल. नागपूर-बिलासपूर आणि नागपूर ते इंदूर दरम्यान वंदे भारत एक्स्प्रेस सुरू आहे. आता नागपूर-सिकंदराबाद वंदे भारत एक्स्प्रेस करण्याचे नियोजन आहे. येत्या १६ सप्टेंबरला ही गाडी सुरू होणार आहे.

# मनसर येथील अनेक युवकांचा शिवसेना उबाठा पक्षात प्रवेश



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १३ :

शिवसेना पक्ष प्रमुख आदरणीय उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्व व विचारावर विश्वास ठेवून व शिवसेना(उ. बा. ठा.) पक्षाचे रामटेक विधानसभा प्रमुख विशाल बरबटे यांच्या प्रमुख उपस्थितीत रामटेक येथील शिवसेना पक्ष जनसंपर्क कार्यालय येथे मनसर येथील स्वरूप वरोकर व पंकज वरोकर यांच्या सह अनेकांनी पक्ष प्रवेश केला.

यावेळी रामटेक विधानसभा प्रमुख विशाल बरबटे व रामटेक तालुका प्रमुख हेमराज चोखांद्रे यांनी पक्ष प्रवेश करणाऱ्या उपस्थित शिवसैनिकांना संबोधित करून पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.

याप्रसंगी प्रामुख्याने विष्णू मदणकर, राजेंद्र खोरगडे, विलास सरोदे, सदानंद मोहुर्ले, रवींद्र चंदनकार, मयूर आलोवार, राजू खोरगडे, ज्ञानेश्वर सहारे, सतीश खोब्रागडे, बबन हजारे, शामलाल जांभूळे, अनिल निलेकर, पंकज सोनवाणे, आदिल परतेती, अलीखान शेख व शुभम डहरिया सह मनसर येथील अनेकांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)पक्षात प्रवेश केला.

## पोलीस अधीक्षक यांची रामाळेश्वर गणेश मंडळ रामटेक येथे भेट



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १३ :

दिनांक १३/०९/२०२४ रोजी नागपूर ग्रामिण पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार यांनी रामटेक पोलीस स्टेशन अंतर्गत येणारे रामाळेश्वर गणपती मंडळाला भेट दिली. गणपतीचे दर्शन घेतले आणि आरती केली. गणेश मंडळाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. गणेश उत्सव दरम्यान कुठल्याही प्रकारचा कायदा व सुवव्यस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये तसेच गणेशोत्सव हा उत्सव शांततेत पार पाडण्यात यावे याबाबत गणेशमंडळाच्या पदाधिकारी यांना मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक रमेश बरकते, पोलीस निरिक्षक प्रशांत काळे,रामाळेश्वर गणेश मंडळाचे अध्यक्ष विश्वास पाटील व पदाधिकारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांमध्ये धार्मिकतेविषयी जागरुकता निर्माण करा : हरिहर महल्ले



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १३ :

येथील आदर्श नगरमधील ॐ साई संगीत विद्यालयाचा भक्ती संगीताचा संगीतमय कार्यक्रम प्राचार्य हरिहर महल्ले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. विद्यार्थ्यामध्ये धार्मीकते विषयी जागरुकता निर्माण व्हावी याच उद्देशाने भक्ती संगीताचा कार्यक्रम घेतला असल्याचे प्राचार्य हरिहर महल्ले यांनी सांगीतले.कार्यक्रमात मृण्मयी ठकरे, फाल्गुनी चरडे, वैदेही सारवे, नीलेश गिरी, स्वरुप खंडारे, श्रीराम लगट, अंजली देवतळे, आशिता माखिजानी, गौरी मातकर, आरोही ठाकरे, संस्कृती तराळेकर, पौणीर्मा वालके, दिव्यांशी खवास, ओवी हनवते, रितुल तलमले, आरोही जुमनाके, अवनी सारवे, सानवी दासरी, सानवी कोलते, रिद्धी झाडे, युक्ती दादलानी, आरव सालेगावकर, वरद देशमुख, साची नागले, सिद्धार्थ मेश्राम आदी विद्यार्थ्यांनी भक्तिगीते सादर करून श्रोत्यांची दाद मिळविली. व उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

आयोजनासाठी तबला वादक शुभम महल्ले, रेखा महल्ले तसेच ॐ साई संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.तबला व संवादिनी हरिहर महल्ले, शुभम महल्ले, ओम कराडे, श्रीयश कराडे, तनुज सुरचुसे, ओजस चाफले, तनीश खवास यांनी साथसंगत केली.

# साई इंटरनॅशनल स्कूलमध्ये गणेशमूर्ती निर्मितीचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. १३ :

साई इंटरनॅशनल स्कूल, शितलवाडी, रामटेक यांनी शाळेच्या आवारात गणेशमूर्ती निर्मिती उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेत १५० पेक्षा अधिक मातीच्या गणेशमूर्ती साकारल्या. त्यांनी त्यांच्या गणेशमूतीर्ला पर्यावरणपूरक साहित्याने सजवले.

तेलावर आधारित चिकणमाती मुलांसाठी सुरक्षित मानली जाते, आणि ते त्वचेवर किंवा इतर पृष्ठभागांना चिकटत नाहीत ज्यांना ते स्पर्श करतात, थोडेसे अवशेष सोडत नाहीत.

ते हवेत कोरडे देखील होत नाहीत, त्यामुळे त्यांचा पुन्हा वापर केला जाऊ शकतो आणि या चिकणमाती नैसर्गिकरित्या सापडलेल्या तेले, खनिजे आणि मेणांपासून बनविल्या जातात. अशा प्रकारच्या चिकणमातीसह काम करणे हा एक बहुसंवेदी अनुभव आहे.

मुलांना चिकणमातीची अनुभूती आवडते आणि ते त्यांना स्वीकारलेल्या मागार्ने गलिच्छ आणि गोंधळात टाकू देते. प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनी सर्व उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. शाळेचे संचालक डॉ.व्ही.बी.नागपुरे यांनी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

# जातीय अत्याचारात मुत्युमूखी पडलेल्या कुटूंबातील सदस्यांना नोकरीची मागणी



## ८०० प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. १३ :

जातीय अत्याचारात मृत्युमुखी पडलेल्या कुटूंबातील सदस्यास तात्काळ नौकरी देण्यात यावी या प्रमुख मागणी करीता नागपूर जिल्हा (ग्रा) कॉंग्रेस कमिटी अनुसूचीत जाती विभागाच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल घरडे यांचे नेतृत्वात निदर्शने करण्यात आली.

अनुसूचीत जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधात्मक अधिनियम १९८९, सुधारीत नियम २०१६ अंतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यातील पिडीत कुटूंबातील मृतकांच्या एका सदस्यास नोकरी देण्याची तरतूद करण्यात आली असली, तरी कोणत्या प्रकारे निवड प्रक्रिया राबवावी याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सुचना नसल्यामुळे पिडीत कुटूंबातील शेकडो सदस्य नोकरी पासुन वंचीत आहेत.

राज्याच्या सामाजीक न्यायविभागाकडे जिल्हास्तरावरुन याबाबतचे ८०० प्रस्ताव पाठविले असुन सध्या हे प्रस्ताव निर्णया अभावी मंत्रालयीन स्तरावर प्रलंबीत आहेत. त्यामुळे पिडीत कुटूंबीयामध्ये शासनाप्रती तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे. केन्द्र शारानाने अनुसूचीत जाती-जगाती अत्याचार प्रतिबंधात्गक अधिनियगात यांची तरतुद केली असली तरी राज्य शासन नौकरी देण्याऐवजी वेळ काढू पणा करीत असल्याचा आरोप जिल्हाध्यक्ष राहुल घरडे यांनी केला आहे.

सदर आशयाचे निवेदन दिं. ८ ऑगस्ट रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देतेन्द्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजीत पतार यांना मुंबई येथील मंत्रलयात नागपूर जिल्हा (ग्रा) कॉंग्रेस कमिटी, अनुसूचीत जाती विभागाचया वतीने निवेदन देण्यात आले असले तरी, अद्यापपर्यंत या बाबत मंत्रालयीन स्तरावर मंद गतिने कार्यवाही सुरु असल्यामुळे अनुसूचीत जाती-जमातीचे प्रश्न सोडविण्यास राज्यशासन जाणीव पूर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे त्याचाच निषेध म्हणून नागपूर जिल्हा (ग्रा) कॉंग्रेस कमिटी, अनुसूचीत जाती विभागाच्या वतीने तिव्र निदर्शने करण्यात आली.

निदर्शने आंदोलनात नागपूर जिल्हा (ग्रा) कॉंग्रेस कमिटी अनुसूचीत जाती विभागाचे जिल्हा प्रभारी राजेश लाडे, जिल्हाअध्यक्ष राहूल घरडे, रामदास कांबळे, नरेन्द्र सहारे, बंडू वैद्य, प्रज्जवल तागडे, राजेन्द्र शेन्डे, विनय गजभिये, चंद्रपाल अढाऊ, सुमेध रंगारी, निलेश शेट्टे, प्रदेश चिमणकर, कृष्णा बोंदलखांडे, मयुर हिरेखण, अक्षय रामटेके, विनोद गेडाम, सत्यवान चौरे, गौमत शेंडे, सुनील गोमासे, प्रसेनजीत सोमकुवर, शुभम शेंडे, इत्यादीचा समावेश होता.

# कोंढाळी येथील एसबीआयच्यावतिने संध्या शिबिरात शेतकऱ्यांना मार्गदर्शन



■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. १३ :

भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया चे कोंढाळी शाखेच्या वतीने पांजरा (काटे)येथे शेतकऱ्यांच्या विविध योजना, कजार्चे योग्य नियोजन तसेच कजार्चे नूतनीकरण, शेतकरी साक्षरता अभियान या संदर्भात शेतकरी संध्या शिबिर घेतले.

शिबिरास स्टेट बँक ऑफ इंडिया चे विभागीय अधिकारी तरूण ठाकरे, स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा कोंढाळी चे शाखा प्रबंधक पंकज तिमांडे, यांचे प्रमुख उपस्थितीत पांजरा काटे गावचे शेतकरी व स्थानिक जनप्रतिनिधीनींचे उपस्थितीत भारतीय स्टेट बँकतर्फे वरील संध्या शिबिरामध्ये विविध योजनांची माहिती तसेच परतफेडीमध्ये थकित न राहता पीक कजार्चे नियोजन कसे करता येईल. तसेच आर्थिक साक्षरता अभियानांतर्गत शासनाच्या जीवन ज्योती विमा योजना, तसेच सुरक्षा विमा योजना, आरोग्य योजना याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

शेतकऱ्यांनी आपल्या पिक कर्ज नियोजन करून पीक कजार्ची वेळेवर परतफेड योग्य वेळेच्या आत करावी सिबिल स्कोर प्रत्येकाने कसा जपावा व येणाऱ्या भावी काळातील बँकिंग जीवनातील गरजांकरिता आपण कसे सज्ज व्हावे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी परिसरातील शेतकरी होते. त्याच प्रमाणे केंद्र सरकारच्या वतीने शेतकरी हितासाठी विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. याप्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना स्टेट बँकेचे व्यवस्थापक व विभागीय अधिकार्यांनी उत्तर दिले. दिलीप नाईक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# आयुष्मान आरोग्य मंदिराचा १ लाख पेक्षा जास्त नागरिकांनी घेतला लाभ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

नागपूर महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाद्वारे संचालित करण्यात येणारे आयुष्मान आरोग्य मंदिर (आरोग्य वर्धिनी केंद्र) चा नागरिकांना मोठ्या प्रमाणात लाभ मदत आहे. आता पर्यंत १,१८,६३० लाभार्थ्यांची बाह्यरुग्ण विभागात निशुल्क तपासणी झाली असून ४४५३ गरोदर मातांची सुद्धा तपासणी करण्यात आली आहे. आरोग्य मंदिरात सर्व सेवा निःशुल्क उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सन २०२१-२२ या वषार्तील नागपूर महानगरपालिका करिता एकूण २० मंजूर करण्यात आलेले होते.तसेच सन २०२२-२३ करिता ९३ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर (आरोग्य वर्धिनी केंद्र) मंजूर करण्यात आलेले आहेत. असे एकूण ११३ केंद्र मंजूर आहेत. आज पर्यंत ३६ आयुष्मान आरोग्य मंदिर (३२ शासकीय ईमारत व ४ भाडे तत्वावरील) कार्यान्वित आहेत व ४ केंद्र (३ शासकीय ईमारत व १ भाडे तत्वावरील) नव्याने सुरु करण्यात आलेले आहेत असे एकूण ४० आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यान्वित आहेत. याव्यतिरिक्त आणखी १४ (२ शासकीय ईमारत व १२ भाडे तत्वावरील)आयुष्मान आरोग्य मंदिर यांचे डागडुजी सुरु असून येत्या काळात ते लोक सेवेकरिता सज्ज असतील.

याव्यतिरिक्त ८ महानगरपालिका मालकीचे ईमारती याकरिता प्रस्तावित असून दुरुस्तीकरण पूर्ण होवून येत्या काळात त्या आयुष्मान आरोग्य मंदिर म्हणून कार्यान्वित होतील .

आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यान्वित करणेबाबत मा.आयुक्त डॉ.अभिजित चौधरी यांचे नेतृत्वात आणि अति. आयुक्त(शहर) आंचल गोयल सूद यांचे मार्गदर्शनात आरोग्य विभाग कामकाज करीत आहेत.

आयुष्मान आरोग्य मंदिर सामान्य नागरिकांकरिता लाभदायक ठरतील व आरोग्य सुविधा अधिक बळकट करण्यात येतील असे प्रतिपादन आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी केले आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे अति. आयुक्त(शहर) आंचल गोयल सूद यांनी आवाहन केले आहे. याकरिता डॉ.दीपक सेलोकर वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. नरेंद्र बहिरवार अति. वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचे चमू कार्य करीत आहेत.

मार्गदर्शक सूचना नुसार पदभरती महानगरपालिका मार्फत करण्यात येत आहे. वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक (पुरुष) व स्टाफ नर्स यांचे नियुक्ती कार्यान्वित केंद्रांमध्ये करण्यात आलेली आहे. परिचर व अटेंडंट हे बाह्यश्रोत एजेन्सी द्वारे करणेत येत आहे.

आवश्यक रक्त तपासणी हि HLL मार्फत करण्यात येईल. टप्प्या टप्प्याने आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. माता तसेच नवजात व बालके यांचे लसीकरण केले जाते ऑक्टोबर २०२३ ते ऑगस्ट २०२४ अखेर पुढीलप्रमाणे सेवा देण्यात आलेल्या आहेत.



- ४४५३ गरोदर मातांची सुद्धा तपासणी
- आणखी १४ आरोग्य मंदिर सुरू होणार

## उपलब्ध सेवा :-

**सर्व सेवा मोफत आहेत. नोंदणी शुल्क सुद्धा नाही.**

१) गर्भधारणा आणि बाळंतपणाची काळजी.
२) नवजात आणि अर्भक आरोग्य सेवा (लसीकरण)
३) बालपण आणि किशोरवयीन आरोग्य सेवा.
४) कुटुंब नियोजन, गर्भनिरोधक सेवा आणि पुनरुत्पादक आरोग्य सेवा
५) राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांसह संसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन
६) सामान्य संसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन आणि तीव्र सामान्य आजार आणि किरकोळ आजारांसाठी बाह्यरुग्ण तपासणी .
७) असंसर्गजन्य रोगांचे स्क्रीनिंग, प्रतिबंध, नियंत्रण आणि व्यवस्थापन
८) सामान्य नेत्ररोग आणि एठळ समस्यांसाठी तपासणी
९) मूलभूत मौखिक आरोग्य सेवा
१०) वृद्ध आणि उपशामक आरोग्य सेवा
११) आपत्कालीन वैद्यकीय सेवा
१२) मानसिक आरोग्याच्या आजारांचे स्क्रीनिंग आणि मूलभूत व्यवस्थापन
१३) योगा

## खुनात ४ महिन्यांपासून फरार आरोपी अटकेत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

यशोधरानगर ठाण्यात नोंद खून प्रकरणात चार महिन्यांपासून फरार आरोपीला पकडण्यात गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाला यश आले आहे. शेख असलम शेख मकसूद (27) रा. म्हाडा कॉलनी, कपिलनगर, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. या प्रकरणात शेख अरबाज शेख इकबाल नावाच्या आरोपीला आधीच अटक झाली आहे. दोघांनीही परिसरातच राहणाऱ्या यश विष्णू गोणेकर (21) याचा खून केला होता. मृतक यश आणि आरोपी अरबाज यांच्यात जुने वैमनस्य होते. यशविरुद्ध चोरी, घरफोडी आणि आर्म्स ॲक्टचे गुन्हे नोंद होते. नंतर त्याने कॅब चालविण्यास सुरुवात केली, मात्र अरबाजशी त्याचे वैमनस्य सुरूच होते. 16 मेच्या रात्री यश घरून ट्रीपसाठी निघाला होता. माजरी परिसरात फरदीन सेलिब्रेशन लॉनजवळ आरोपींनी त्याची कॅब अडविली. जुन्या वादातून त्याच्यावर चाकूने सपासप वार करीत रक्ताच्या थारोळ्यात लोळवले. उपचारादरम्यान यशचा मृत्यू झाला. यशोधरानगर पोलिसांनी यशचे वडील विष्णू यांच्या तक्रारीवरून खुनाचा गुन्हा नोंदविला. या दरम्यान फरदीन सेलिब्रेशन जवळ असलम फिरताना पोलिसांना आढळला. संशयातून त्याला ताब्यात घेत चौकशी केली असता खुनात फरार असल्याची माहिती समोर आली.

# कृत्रिम टँकमध्येच मूर्ती विसर्जित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

एक काळ असा होता की गणपती उत्सवात मूर्तीचे मोठ्या प्रमाणात विसर्जन केल्यामुळे आपले सर्व तलाव प्रदूषित व्हायचे. मात्र काही स्वयंसेवी संस्थांच्या सहकायार्ने नागपूर महानगर पालिकेच्या अथक प्रयत्नांमुळे आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. यंदा महापालिकेने नागपूर शहरातील सर्व तलावांचे बॅरिकेडिंग केले असून 4 फुटापेक्षा कमी उंचीच्या मूर्ती विसर्जनासाठी संपूर्ण शहरात 419 कृत्रिम तलाव तयार केले आहे.

2010 पासून विसर्जनाच्या सर्व 10 दिवस फुटाळा तलावावर मोहीम राबवणाऱ्या ग्रीन व्हिजिल फाउंडेशनच्या टीम लीड सुरभी जयस्वाल यांनी सांगितले की नागरिकांच्या मानसिकतेत पूर्ण बदल झाला आहे. दशकभरापूर्वी भक्तांना तलावात मूर्ती विसर्जित करू नयेत हे पटवून देणे अत्यंत अवघड होते ते निर्माल्य आमच्याकडे सुपूर्द करायलाही तयार नव्हते पण आता लोकांना तलाव संवर्धनाचे महत्त्व आणि गरज समजली आहे त्यामुळे गेल्या वर्षभरापासून तलावांमध्ये एकाही मूतीर्चे विसर्जन केले जात नाही.





ग्रीन व्हिजिलचे डेप्युटी टीम लीड मेहुल कोसुरकर यांनी बंदी असतानाही बाजारात पीओपीच्या मूर्ती असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. विसर्जनाच्या पहिल्या पाच दिवसात फुटाळा तलावाच्या बाजूला असलेल्या कृत्रिम तलावात विसर्जन केलेल्या 900 मूर्तीपैकी 29 मूर्ती पीओपी होत्या, असा त्यांचा अंदाज आहे.

ग्रीन व्हिजिल फाउंडेशन हे पर्यावरणपूरक गणपती विसर्जन मोहिमेचा अविभाज्य भाग आहे आणि 2010 पासून एनएमसीला मदत करत आहे. हे 14 वे वर्ष आहे जेव्हा ग्रीन व्हिजिलचे सुमारे 40 सदस्य कृत्रिम तलावांमध्ये मूर्तीचे विसर्जन आणि निर्माल्य संकलनासाठी फुटाळा तलावाच्या हवाई दलाच्या दिशेने मोहीम राबवत आहेत.

ग्रीन व्हिजिल टीमचे सदस्य कौस्तव चॅटर्जी, सुरभी जैस्वाल, मेहुल कोसुरकर, बिष्णुदेव यादव, श्रेया जोगे, तुषार देशमुख, पार्थ जुमडे, पिनाकी बनिक आणि इतर टीम सदस्य या मोहिमेसाठी परिश्रम घेत आहेत. कमला नेहरू महाविद्यालयातील पर्यावरणशास्त्र विभागाचे नेहा ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेसाठी ग्रीन व्हिजिलमध्ये सहभागी झाले आहे.

## अमरावती लूट प्रकरण : २ आरोपींना गोधनीतून अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

अमरावती येथे सराफा व्यापाऱ्यांना लुटून फरार झालेल्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने गोधनी परिसरातून अटक केली आहे. ग्यासोद्दीन वहाजोदिन कुरेशी (42) रा. रामपूर, उत्तर प्रदेश आणि मोहम्मद साजिक खान मोहम्मद हारुण (37) रा. हिरापूर, बालाघाट, अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

मोहम्मद साजिकने आरोपींना माल विकण्यात मदत केली होती. या प्रकरणातील आरोपींचे उत्तरप्रदेशातील दरोडेखोरांच्या टोळीशी संबंध असल्याची माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गत 4 सप्टेंबरच्या सकाळी 11.30 वाजताच्या सुमारास अमरावतीच्या जवाहरनगरात सराफा व्यवसायी अरविंद जावरे आणि त्यांच्या वडिलांना लुटण्यात आले होते.

दुचाकी आणि कारने आलेल्या 8 आरोपींनी पिस्तूलाचा धाक दाखवून चांदीच्या भांड्यांनी भरलेली बॅग पळवून नेली होती. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेने पोलिसांना चांगलाच घाम फोडला होता. पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. आरोपींना शोधण्यासाठी अमरावती ते दुर्ग असा 500 किमीपर्यंतचे अंतर पिंजून काढण्यात आले. प्रत्येक पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी फुटेज तपासण्यात आली.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ६६ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ५० मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. शुक्रवार (13) रोजी शोध पथकाने 53 प्रकरणांची नोंद करून 52,400/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 8 प्रकरणांची नोंद करून 3,200/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून 200/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 3 प्रकरणांची नोंद करून 1200/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटिल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 15 प्रकरणांची नोंद करून 25,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/साठवणे,प्रथम 48 तासात हटविण्याची नोटीस देऊन न हटविल्यास या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 5,000 रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 14 प्रकरणांची नोंद करून 2,800/- दंड वसूल करण्यात आलेला आहे.





उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 8 प्रकरणांची नोंद करून 8,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. हरित लवाद यांनी दिलेल्या दि. 03.07.2017 च्या आदेशाप्रमाणे व दिलेल्या निदेर्शाप्रमाणे विवाह सभागृह या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 5,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत मे. द कबाब यांच्यावर प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला व संजय तुकाराम यांनी हॉटेलचा कचरा रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला.

हनुमान नगर झोन अंतर्गत मे. वेगास प्रिमियम यांनी हॉटेलचा कचरा रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. धंतोली झोन अंतर्गत मे. साई कस्टल 6 यांनी रस्त्यावर सी अँड डी कचरा टाकल्याबद्दल रू. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आला.

गांधीबाग झोन अंतर्गत मे. मीना स्वीटस भंडार यांच्या यांच्यावर प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. मंगळवारी झोन अंतर्गत मे. सलाम अहम्मद यांनी दुकानातील कचरा अनधिकृत ठिकाणी टाकल्या बद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला.

# ईडीची भीती दाखवून २ कोटी हडपले

## शेतजमीन खरेदी-विक्री प्रकरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

शेतजमीन खरेदी-विक्रीत मिळालेल्या कोट्यवधी रुपयांपैकी जवळपास अर्धी रक्कम आरोपींनी हडपली. मोठी रक्कम असल्याने ईडी आणि आयकर विभागात येरझारा माराव्या लागतील, अशी भीती आरोपींनी दाखविली होती. या प्रकरणी पारडी पोलिसांनी बंडू बांगडे यांच्या तक्रारीवरून दीपक अगरवाल व बनवारी भुतडा यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे. आर्थिक गुन्हे शाखा या प्रकरणाचा तपास करीत आहे.

आरोपी बनवारी भुतडा हा भुतडा ॲण्ड कंपनीचा संचालक आहे. बांगडे यांची पारडी परिसरात पुनापूर येथे खसरा क्र. 14/2 व 22/2 अशी 6 एकर शेती आहे. आरोपींच्या मदतीने त्या शेतीच्या खरेदी-विक्रीचा सौदा 4 कोटी 62 लाख रुपयांत झाला.

मात्र, विक्रीपत्रात आरोपींनी शेतीचा सौदा 5 कोटी 70 लाख असा दाखविला. तसेच सौद्यात ठरलेली किंमत बांगडे यांना दिली नाही. शेत विक्रीतून मिळालेले 2 कोटी 62 लाख रुपये पीडिताच्या बँक खात्यात असल्याने आरोपींनी ईडी आणि आयकर विभागाची भीती दाखविली. मोठ्या प्रमाणात रक्कम असल्याने आयकर विभागात येरझारा माराव्या लागतील, असा धाक दाखविला.

खात्यात जमा करण्यात आलेल्या रकमेपैकी 1 कोटी 96 लाख 69 हजार रुपये त्यांनी बांगडे यांच्या बँक खात्यातून श्याम स्टील, भुतडा ॲण्ड फायनान्शिअल, ग्रानिफ ट्रेडलिंक या फर्मच्या बँक खात्यात वळते करून घेतले.

तसेच बांगडे यांचे शेतही विकले. अशा प्रकारे आरोपींनी शेती खरेदी-विक्री व्यवहारामध्ये बांगडे यांची फसवणूक केली. पोलिसांनी आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. ही कारवाई पोलिस उपायुक्त अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक सागर आव्हाड यांच्यासह पोहवा पंढरी खोंडे, रवींद्र जाधव, अविक्षणी भगत, विजय यादव यांनी केली.

## गणरायाने नागपुरात साकारलेली विविध रूपे



हिंगणा तालुक्यातील नेरी मानकर येथील मेघनाथ ठाकरे, ज्ञानेश्वर ठाकरे यांच्या घरी विराजमान गणपती



नंदकिशोर वासुदेव पापडकर राजाजी वार्ड, रामटेक यांच्या घरी गणपती



फेटरी येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील आकर्षक गणपती बाप्पाची मूर्ति आयोजनासाठी जीवन लंगडे, अनिकेत नेरकर, रोशन लसुंते, करण चीपडे, गौरव बावनकर प्रतीक लंगडे प्रयत्नरत आहे.



राजेंद्र जयस्वाल, कमाल चौक, नागपूर यांच्या निवासस्थानी विराजमान बाप्पा

## सिनीयर भोसला पॅलेस येथील गणपती बाप्पाचे ३६१ व्या वर्षी विसर्जन




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

इसवी सन 1708 पासून पंरपरेनुसार चालत आलेल्या महाल येथील राजे मुधोजी महाराज भोसले यांच्या सिनीयर भोसला पॅलेस येथे 316 व्या वर्षी सातव्या दिवशी दशमी ला श्री गणेशाच्या मुतीर्चे पालखीतुन विसर्जन करण्यात आहे. या गणपतीची विशेषतः अशी की, 316 वषार्पासून एका आकाराचा, एका रंगाचा, नागपूरकर भोंसले कालीन सिरपेजतुरा असलेली पगडी घालून या गणपतीरायांना पालखीत आणले जाते.

विर्सजनाच्या दिवशी पण पालखीत जातातत अशी या श्री गणेशाची विशेषतः आहे.